१४ वर्ष वर्धापन दिन

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३३९ ■ गुरूवार, दि.१८ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


# अकोल्यात दुधाच्या कंटेनरमधून गुटखा तस्करी

## अन्न व औषध प्रशासन सुस्त की गुटखा माफियांशी हातमिळवणी



प्रतिनिधी १८ जून

**अकोला:** गोरगरीबांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या गुटखा माफियांचे धाबे दणाणण्याऐवजी, अकोल्यात अन्न व औषध प्रशासन आणि गुटखा तस्करांचे साटंलोटं असल्याचा खळबळजनक संशय आता बळावला आहे. बुधवारी जुन्या शहरात झालेल्या एका कारवाईच्या नावाखाली झालेल्या 'फार्स'मुळे अन्न व औषध प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सोनटक्के प्लॉट येथे टाकलेली धाड केवळ नाटक असल्याची माहिती समोर आली आहे. फसव्या धाडी टाकून गुटखा माफियांना सतर्क करण्याचा उद्योग अकोल्यात सुरु असल्याची ओरड आहे. गुटखा माफियांना अभय देण्याचा हा खेळ नवीन नाही. यापूर्वी गाजलेल्या शेगाव गुटखा प्रकरणात सामील असलेल्या बड्या माशांवर थेट 'मकोका' सारखा कडक कायदा का लावला गेला नाही? यावरून अन्न व औषध प्रशासन विभागातच सध्या कमालीची धुसफूस आणि उलट-सुलट चर्चा सुरू आहे.

### अंड्याच्या दुकानातील धाड 'फेल' कशी ?

बुधवारी जुन्या शहरातील सोनटक्के प्लॉट परिसरात मोठी कारवाई करण्यासाठी पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाचे पथक पोहोचले खरे, पण तिथे पोहोचण्यापूर्वीच 'गुटखा लंपास' झाला होता. कारवाईची गुप्त माहिती लीक कशी झाली? अधिकारीच गुटखा माफियांना आधीच सतर्क तर करत नाहीत ना? हे पाप लपवण्यासाठी आता अधिकारी आणि वाहन चालकांचे मोबाईल कॉल डिटेल्स (CDR) तपासण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे. दूध का दूध आणि पाणी का पाणी झालंच पाहिजे. या कारवाईदरम्यान आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला. जुन्या शहरातील सोनटक्के प्लॉट येथे मोहम्मद नामक व्यापारी अंड्याच्या दुकानाच्या आडून गुटख्याचा काळाबाजार करत असल्याची पक्की माहिती होती. मोठा पोलीस बंदोबस्त असतानाही अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी तिथे कारवाई न करता नेमके का घाबरले? कोणाच्या दबावापोटी किंवा 'प्रसादामुळे' मोहम्मदवरील कारवाई टाळण्यात आली, याचा शोध घेणे गरजेचे आहे.

### ठराविक ग्राहकांना मिळतो विनासायास गुटखा!

बाजारात गुटखा विक्रीच्या दुकानातून गुटखा गायब झाला असला तरी तो विशिष्ट ग्राहकांना व किरकोळ व्यापाऱ्यांना तो सहज मिळत असल्याची चर्चा जोरात सुरू आहे. एफडीएच्या कारवाईमुळे आता हा गुटखा दुप्पट, तिप्पट रक्कम देऊन घ्यावा लागत आहे. याची माहिती एफडीएच्या अधिकाऱ्यांना असूनही या ठिकाणी का कारवाई करण्यात येत नाही, असा सवालही सर्वसामान्य नागरिकांमधून उपस्थित करण्यात येत आहे.

### अधिकाऱ्यांचे नाक बंद

गुटखा माफिया नरेश सेठ याच्या गुटख्याची वाहतूक करण्यासाठी थेट 'दूध वाहतूक' करणाऱ्या बंद कंटेनरचा वापर केला जात आहे. नरेश सेठच्या गुटख्याला चक्क दुधाचा वास येत असल्याची चर्चा असताना, अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांचे नाक आणि डोळे नक्की कोणासाठी बंद होते, असा जळजळीत प्रश्न विचारला जात आहे. गुटख्याच्या पुड्याला दूधाचा वास येत असताना अन्न व औषध प्रशासनातील अधिकाऱ्यांची डोळेझाक का असा प्रश्न उपस्थित होत आहे. केवळ गुटखा माफियांवर नाही तर दुधाचे कंटेनर व दुध उत्पादक वितरकांवर देखील मकोका लावण्याची गरज आहे. त्याच बरोबर या दुध उत्पादकांचे दुध तपासल्यास मोठा धक्का बसू शकतो अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

# आज मतदान

प्रतिनिधी १८ जून

**मुंबई :** राज्यातल्या विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी गुरूवारी मतदान पार पडणार आहे. मतदानाची औपचारिकता पार पडण्यापूर्वीच महायुतीने मोठा राजकीय 'मास्टरस्ट्रोक' लगावला आहे. या अकरापैकी तब्बल सहा जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. या बिनविरोध विजयामुळे सत्ताधारी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीच्या गोटात प्रचंड उत्साहाचे वातावरण आहे. विधानपरिषदेच्या सहा बिनविरोध जागा वगळता आज सोलापूर, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, नागपूर, भंडारा-गोंदिया, नाशिक, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर-जालना या ठिकाणी मतदान पार पडणार आहे.

### नाशिककडे सर्वांचे लक्ष

नाशिकमध्ये महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांच्यासह माघार घेतलेले गोकुळ गिते आणि प्रसाद हिरे यांचीही नावे मतपत्रिकांवर असल्याने निवडणुकीत माघारीनंतरही रंगत आहे. महायुतीचे उमेदवार ठाणे येथे सहलीसाठी गेल्याने एकत्र मतदानाला येतील, तर महाविकास आघाडीचे मतदारही सकाळपासूनच मतदानाला येणार आहे. महापौर, उपमहापौर, गणेश गिते यांच्यां पत्नी मतदानाचा हक्क बजावणार आहेत.






# टोइंग पथकाची रस्त्यावर दादागिरी आणि वसुलीचा धंदा

प्रतिनिधी १८ जून



**अकोला:** शहरातील रस्त्यांवर नो-पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या गाड्यांवर कारवाई करणाऱ्या टोइंग पथकाची दादागिरी आणि वसुलीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रस्त्यावरील गाड्या उचलून नेल्यानंतर, काही अंतरावर जाऊन पैशांची देवाणघेवाण करून गाड्या सोडल्या जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. या विषयीचा एक व्हिडीओ आर आर सी न्यूजने बुधवारी प्रसारीत केला आहे. त्यामुळे या टोईंग गाडीच्या कारभारावर प्रश्न उपस्थित होत आहे.

तुम्ही पाहत असलेला हा व्हिडीओ रस्त्यात सेटिंग झाल्याचा आहे. दिवसभरात जवळपास ५० गाड्या उचलल्या जातात, मात्र त्यातील केवळ ३० गाड्यांचीच अधिकृत पावती फाडली जाते आणि उर्वरित २० गाड्यांकडून छुपा दंड वसूल करून त्यांना वाटेतच सोडून दिले जात असल्याचे बोलले जात आहे. शहरात वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी महापालिका आणि पोलीस प्रशासनाकडून टोइंग पथके नेमण्यात आली आहेत. मात्र, ही पथके शिस्त लावण्याऐवजी स्वतःचा खिसा भरण्यातच मग्न असल्याचे चित्र आहे. रस्त्यावरून ज्या गाड्या उचलल्या जातात, त्यांच्या मालकांकडून अनधिकृतपणे पैसे उकळले जात आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पथक गाड्या उचलून मुख्य चौकातून थोडे पुढे गेले की, तिथे 'तोडपाणी'चा खेळ सुरू होतो. या सर्व प्रकारामुळे शासकीय महसुलाचे मोठे नुकसान होत असून, टोइंग कर्मचाऱ्यांची ही बेकायदेशीर वसुली आणि दादागिरी थांबणार कधी?

# जितके अवैध बांधकाम, तितके पाडा

## एस.आर.पाटील कॉलेजवरील मनपाच्या कारवाईवर स्थानिकांचा तीव्र आक्षेप

प्रतिनिधी १८ जून





**अकोला:** हरिश अश्विन कॉलनीतील 'एस.आर.पाटील कॉलेज'च्या अवैध बांधकामावर अखेर महापालिकेने हातोडा चालवला खरा, मात्र ही कारवाई केवळ 'थातूरमातूर' असल्याचा गंभीर आरोप आता स्थानिक नागरिकांनी केला आहे. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर सुरू झालेली ही कारवाई केवळ दाखवण्यापुरतीच होती का, असा संतप्त सवाल रहिवाशांनी उपस्थित केला असून, नियमानुसार संपूर्ण अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त करण्यात यावे, अशी आक्रमक मागणी आता जोर धरू लागली आहे. या सर्व प्रकरणात झोन अधिकारी व अतिक्रमण निर्मुलन अधिकारी यांच्या चौकशीची गरज व्यक्त केल्या जात आहे.

हरिश अश्विन कॉलनीतील 'एस.आर.पाटील कॉलेज'च्या बेकायदेशीर बांधकामावर महापालिकेने बुधवार सायंकाळी १ तास पोलीस बंदोबस्त मिळताच कारवाई सुरू केली. मात्र, या कारवाईच्या संथ गतीने आणि पद्धतीमुळे महापालिका प्रशासन आणि अतिक्रमण विभागाच्या हेतूवरच आता स्थानिक नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

वास्तविक पाहता, ही कारवाई करण्यासाठी अतिक्रमण विभाग नियोजित वेळेपेक्षा अत्यंत उशिरा म्हणजेच दुपारी २ वाजता घटनास्थळी पोहोचला. त्यानंतर केवळ मोजणी आणि इतर तांत्रिक बाबींमध्येच अधिकाऱ्यांनी ३ ते ३:३० वाजेपर्यंतचा वेळ घालवला. ४ वाजले तरी कारवाई सुरू न झाल्याने नागरिकांनी चौकशी केली, तेव्हा नेहमीप्रमाणे 'पोलीस बंदोबस्त नाही' हेच कारण पुढे करण्यात आले. शेवटी महापालिकेच्या या 'टाईमपास'ला कंटाळून स्थानिक नागरिकांनी स्वतः पुढाकार घेतला. नागरिकांनी थेट ११२ क्रमांकावर, संबंधित पोलीस ठाण्यात आणि पी.एस.आय. यांना फोन करून पोलीस बंदोबस्त पाचारण केला.

पोलीस आल्यानंतर साधारणतः पाऊणे पाच वाजता प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात झाली, मात्र ती केवळ संध्याकाळी ६ वाजेपर्यंत, म्हणजेच फक्त एकच तास चालली. या अवघ्या एका तासाच्या कारवाईत मनपाने केवळ वरची पॅरापेट वॉल आणि समोरील किरकोळ भाग पाडून मोकळे झाले. विदर्भ ग्रामीण शिक्षण संस्थेने नियमानुसार केवळ १४१ चौ.मी. ची मंजुरी असताना ३२४ चौ.मी. एवढे अतिरिक्त व अनधिकृत बांधकाम केले आहे, हे स्वतः महापालिकेने सिद्ध केले आहे. रहिवासी भूखंडावर उभारलेल्या या कॉलेजचे संपूर्ण अनधिकृत स्क्वेअर फीट बांधकाम पाडणे अपेक्षित असताना, प्रशासनाने केवळ थातूरमातूर कारवाई करून वेळ मारून नेली.

४ जून रोजी पोलीस बंदोबस्त नाही म्हणून कारवाई टाळणारे प्रशासन, काल अचानक विना पोलीस बंदोबस्त केवळ दिखाव्यासाठी पूर्ण ताफा घेऊन कसे पोहोचले? आणि पोलीस आल्यावरही केवळ एकच तास थातूरमातूर कारवाई का करण्यात आली? असे अनेक सवाल आता उपस्थित होत आहेत. 'जितके अवैध बांधकाम आहे, ते नियमानुसार पूर्णपणे पाडलेच पाहिजे,' अशी ठाम भूमिका घेत नागरिकांनी आता वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे.

# 'व्हिप' धुडकावत बंडखोर खासदारांनी मारली दांडी!

वृत्तसंस्था १८ जून

**दिल्ली :** महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा २०२२ सारख्या मोठ्या भूकंपाची पुनरावृत्ती होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाने बंडखोरी रोखण्यासाठी आणि आपल्या खासदारांची एकनिष्ठता तपासण्यासाठी आज दिल्लीत बोलावलेल्या आपत्कालीन बैठकीत ठाकरे गटाला मोठा झटका बसला आहे. 'थ्री-लाइन व्हिप' जारी करूनही सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या या बैठकीला संजय राऊतांसह केवळ ३ खासदार उपस्थित राहिले आहेत, तर उर्वरित ६ बंडखोर खासदारांनी या बैठकीकडे साफ पाठ फिरवली आहे, हे स्पष्ट झाले आहे. पक्षातील संभाव्य बंडखोरी मोडून काढण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार दिल्लीतील जुन्या संसद भवनात ही तातडीची बैठक बोलावण्यात आली आहे. खासदारांची अधिकृत उपस्थिती नोंदवण्यासाठी स्वतंत्र कॉपी (उपस्थिती पुस्तक) तयार करण्यात आली होती.

# आता मुंबई महापालिकेत 'ऑपरेशन टायगर'?

प्रतिनिधी १८ जून

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात लोकसभा पातळीवर 'ऑपरेशन टायगर' अंतर्गत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ६ खासदार फुटल्याची चर्चा आहे. त्यातच आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने आपला मोर्चा थेट मुंबई महानगरपालिकेकडे वळवला आहे. दिल्लीतील भूकंपानंतर आता मुंबई पालिकेतही 'ऑपरेशन टायगर' सक्रिय झाल्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. ठाकरे गटाचे २० पेक्षा जास्त नगरसेवक हे एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याचा खळबळजनक दावा शिंदे गटाचे नगरसेवक किरण लांडगे यांनी केला आहे.

शिंदे गटाचे नगरसेवक किरण लांडगे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, ठाकरे गटाचे २० पेक्षा जास्त माजी नगरसेवक आमच्या संपर्कात असून, 'पक्षात केव्हा आणि कधी प्रवेश करायचा आहे?' अशी विचारणा या नगरसेवकांकडून केली जात आहे. या नगरसेवकांबाबत लवकरच योग्य तो वरिष्ठ पातळीवर निर्णय घेतला जाईल. हे २० नगरसेवक अधिकृतपणे शिवसेनेत सामील झाल्यावर पालिकेत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे संख्याबळ आणि ताकद मोठ्या प्रमाणावर वाढेल, असा विश्वास लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

### 'ऑपरेशन टायगर'ची २१ जूननंतर अधिकृत घोषणा?

ठाकरे गटाच्या ६ खासदारांच्या विलीनीकरणाचा सोहळा १९ जून रोजी शिवसेनेच्या वर्धापनदिनानिमित्त होण्याची दाट शक्यता होती. मात्र, काही तांत्रिक आणि कायदेशीर बाबी अद्याप शिल्लक असल्याने हा निर्णय काही काळ पुढे ढकलला जाण्याची शक्यता आहे. आता २१ जूननंतर या ६ खासदारांच्या विलीनीकरणाची अधिकृत घोषणा कधीही होऊ शकते.






# भारताच्या इतिहासातील सर्वात मोठा आयपीओ बाजारात येणार!

वृत्तसंस्था १८ जून



**नवी दिल्ली :** लवकरच भारतीय शेअर बाजारात सर्वाधिक चर्चित आयपीओ येणार आहे. देशातील सर्वात मोठा स्टॉक एक्स्चेंज असलेल्या नॅशनल स्टॉक एक्स्चेंज (एनएसई) ने बाजार नियामक 'सेबी'कडे आपला मसुदा, म्हणजेच 'ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस' दाखल केला आहे. यामुळे एनएसईचा आयपीओ लवकरच बाजारात येण्याची शक्यता वर्तवली जात असून, हा भारताच्या इतिहासातील आतापर्यंतचा सर्वात मोठा आयपीओ ठरण्याची शक्यता आहे. एनएसईने आपल्या प्रस्तावित आयपीओसाठी तब्बल २० गुंतवणूक बँकांची बुक रनिंग लीड मॅनेजर म्हणून नियुक्ती केली आहे. एखाद्या सार्वजनिक निर्गमासाठी करण्यात आलेल्या सर्वात मोठ्या नियुक्त्यांपैकी ही एक मानली जात आहे. या आयपीओमधून एनएसई कोणतेही नवे भांडवल उभारणार नाही. त्याऐवजी विद्यमान भागधारक आपली हिस्सेदारी विकणार आहेत. या प्रक्रियेला ऑफर फॉर सेल असे म्हटले जाते. दाखल कागदपत्रांनुसार, एसबीआय, आयडीबीआय बँक, एसबीआय कॅपिटल मार्केट्स, आयएफसीआय आणि बँक ऑफ बडोदा या पाच सरकारी संस्था मिळून सुमारे २.३७ कोटी शेअर्स विकण्याची योजना आखत आहेत.

या आयपीओअंतर्गत एकूण १४.८९ कोटी इक्विटी शेअर्स विक्रीसाठी उपलब्ध करून दिले जाणार आहेत. हे एनएसईच्या एकूण भरलेल्या भागभांडवलाच्या सुमारे ६ टक्के इतके आहे. बाजारातील अंदाजानुसार एनएसईचे मूल्यांकन सुमारे ५ लाख कोटी रुपये आहे.

### एलआयसी आणि दमानीचा मोठा निर्णय

विशेष म्हणजे काही मोठ्या गुंतवणूकदारांनी या आयपीओमध्ये आपली हिस्सेदारी विकण्यास नकार दिला आहे. एलआयसी , प्रेमजी इन्व्हेस्ट आणि डी-मार्टचे प्रवर्तक राधाकिशन दमानी यांनी आपले शेअर्स कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. बाजारात याकडे एनएसईच्या भविष्यातील वाढीबाबत सकारात्मक संकेत म्हणून पाहिले जात आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
गुरुवार दि. १८ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## बालगीत
## अंगतपंगत

अंगतपंगत रंगलीय भारी
वाढायला आली पोरं आणि पोरी
गणूनी आणली कांदा-मूळा-भाकरी
चंदूनी आणलीत बिस्कीट नी खारी

आलेत चार-दोन बाळे गोजिरवाणी
जेऊ घातलं त्यांनाही पाजलं पाणी
मौजमजेत जेवण झालं छान
पंचपक्वानांनी सजलय पान

अंगतपंगतची गंमतच न्यारी
कुणी केला नाच तर कुणी म्हटली गाणी
संगतीच्या वा-यात रोज आम्ही न्हाऊ
संगमंग चार घास जास्तच खाऊ



कवयित्री
सौ. भावना अजय इटकीकर

# उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचे अभिनंदन पण...!

प्रा. डॉ. एम.आर. इंगळे
सेवानिवृत्त प्रोफेसर आणि संविधान प्रचारक तथा विभागीय सचिव डाटा अकोला

महाराष्ट्राची स्थिती वरवर खूप प्रगतीशील आणि गतिमान दिसत असली तरी वास्तव वेगळे असल्याचा अनुभव सुजाण नागरिकांना येत आहे. शासन प्रशासन कागदावर खूप कार्यक्षम व लोकांच्या विकासासाठी तत्पर असल्याचे दाखविले जाते मात्र प्रत्यक्षात लोकांना किती समस्यांना तोंड देत जीवन जगावे लागते याचा अनुभव सर्वसामान्यांसाठी नेहमीचा झाला आहे, पण शासन व प्रशासंकर्त्यांना याची जाणीव नसते, कारण त्यांच्या सेवेसाठी सरकारी यंत्रणा सज्ज असते.

**शासकीय रुग्णालयाची अवस्था :**
महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी नुकतीच बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय रुग्णालयाला अचानक भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी आरोग्य सेवांचा प्रत्यक्ष आढावा घेतला आणि रुग्णालयातील विविध विभागांना भेटी दिल्या. या भेटीत त्यांनी रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा, रुग्णालयातील स्वच्छतेची स्थिती, औषधांचा पुरवठा आणि रुग्णालयातील एकूण व्यवस्थापनाची माहिती तर घेतली पण रुग्णालयातील अस्वच्छता पाहून खेद व्यक्त करत अशी स्वच्छता असते का? दिवसभर काय करता? फक्त मोबाईल पाहता?' असं म्हणून रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना झापलं आणि रुग्णालय प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची खरडपट्टी काढली. याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. पण अशा भेटी फक्त कधी कधी होतात, त्यामुळे अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर तात्पुरता परिणाम होतो आणि नंतर 'जैसे थे' अशीच परिस्थिती सगळीकडे सुरू असते.

**नियमित स्टाफची कमतरता :**
गेल्या अनेक वर्षापासून रुग्णालयांमध्ये नियमित डॉक्टर, कर्मचारी, नर्सेस इत्यादींची भरती बंद असल्यामुळे रुग्णालयात आवश्यक स्टाफ अपुरा आहे. या अपुऱ्या संख्येमुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत आहे, त्यामुळे ते स्वच्छतेकडे दुर्लक्ष करतात. शासकीय रुग्णालयांमधील प्रशासनात आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत तत्परता नसून कर्मचाऱ्यांना आहे त्या परिस्थितीत काम करणे भाग पडते. तसेच रुग्णालय प्रशासनात भ्रष्टाचार देखील वाढला आहे, त्यामुळे औषध, गोळ्या व इतर साहित्यात फेरफार करून तुटवडा निर्माण केला जातो आणि रुग्णांना बाहेरून औषध गोळ्या आणायला सांगितल्या जातात अशी बऱ्याच शासकीय रुग्णालयाची स्थिती आहे.
अलिकडे शासन बहुतांश क्षेत्रात नियमित कर्मचारी भरती करण्याऐवजी कंत्राटी पद्धतीने कर्मचारी भरती करत असून त्यांना फारच तोकडे मानधन दिले जाते. मात्र त्यांना नियमित डॉक्टर, नर्स व इतर कर्मचारी यांच्याप्रमाणेच काम करावे तर लागतेच पण नियमित स्टाफ आपल्या कामाचा अतिरिक्त भार देखील या कंत्राटी लोकांवर ढकलून देतात. त्यामुळे रुग्णाच्या सेवेवर आणि स्वच्छता राखण्यावर विपरित परिणाम होतो. पण शासन प्रशासनाकडे या समस्यांकडे लक्ष द्यायला वेळ नसतो, त्यामुळे ते कधी कधी रुग्णालयांना भेटी देतात आणि मग वास्तव त्यांच्या लक्षात येते.
याशिवाय शासनाकडून प्राप्त होणारा निधी, सोयीसुविधा, औषध गोळ्यांचा पुरवठा अपुरा असतो. या सर्वांचा परिपाक म्हणजे 'जैसा है वैसाही चलावो' ही प्रवृत्ती वाढते.

**शासनकर्त्यांची जबाबदारी:**
रुग्णालये असो वा कोणतेही खाते त्याची अंतिम जबाबदारी त्या त्या खात्याच्या मंत्र्याची असते. म्हणून प्रत्येक मंत्र्याने आपल्या खात्याचा कारभारावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. त्यामुळे जर शासनकर्त्यांना खरंच सर्व खात्यांचा कारभार स्वच्छ, निरपेक्ष, भ्रष्टाचार मुक्त आणि पारदर्शक हवा असेल तर केवळ विरोधी पक्षांवर आरोप प्रत्यारोप करण्यात दंग न राहता किंवा प्रत्येक गोष्टीचे राजकारण न करता मंत्र्यांनी, राज्यमंत्र्यांनी आपापल्या खात्याला वारंवार भेटी देऊन व्यवस्थेची पाहणी केली पाहिजे आणि प्रत्येक गोष्टीत श्रेय घेण्याची आणि राजकारण करण्याची घाणेरडी वृत्ती सोडून दिली पाहिजे. तसेच सर्व विभागांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.
तरच कर्मचारी प्रशासनाला धारेवर धरण्यात किंवा त्यांना झापण्यात अर्थ आहे.
अन्यथा 'बोलाचीच कढी अन् बोलाचाच भात, जेवुनिया तृप्त होई कैसा.' असेच होणार हे निश्चित.

# नवीन कामगार संहितांच्या अंमलबजावणीसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करा : ॲड आकाश फुंडकर

**मुंबई :** बदलत्या औद्योगिक आणि आर्थिक परिस्थितीत नवीन कामगार संहितांची प्रभावी अंमल बजावणी ही काळाची गरज आहे. त्यासाठी सक्षम, प्रशिक्षित आणि अभ्यासू अधिकारी वर्ग तयार होणे अत्यंत आवश्यक आहे. या प्रशिक्षणातून सहभागी अधिकारी हे केवळ प्रशिक्षणार्थी न राहता 'मास्टर ट्रेनर' म्हणून उदयास यावेत आणि कामगार विभागातील इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांपर्यंत नवीन कामगार कायद्यांचे ज्ञान पोहोचवावे, असे प्रतिपादन कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केले आहे.

परळ येथील ना.मे.लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेच्या वतीने आयोजित 'नवीन कामगार संहिता आणि कामगार कायद्यातील बदल' या विषयावरील चार दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये मंत्री ॲड. फुंडकर बोलत होते. प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना संबोधित करताना मंत्री ॲड. फुंडकर म्हणाले, कामगार विभाग हा शासन आणि समाज यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. कामगारांचे संरक्षण, सामाजिक सुरक्षा आणि उद्योगांच्या प्रगतीसाठी विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.



त्यामुळे प्रत्येक अधिकाऱ्याने आपल्या जबाबदाऱ्या संवेदनशीलतेने आणि कार्यक्षमतेने पार पाडाव्यात. नवीन कामगार संहितांबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून त्यांचा लाभ कामगार आणि उद्योग या दोन्ही घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहावे.

संस्थेच्या संचालक रोशनी कदम - पाटील यांनी आपल्या मनोगतात प्रशिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे स्पष्ट करुन अधिकारी वर्गाची भूमिका विषद केली. राज्यातील विविध विभागांतून आलेले कामगार विभागाचे अधिकारी, प्रशिक्षणार्थी तसेच संस्थेचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. नवीन कामगार संहितांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षित अधिकारी वर्ग हीच खरी ताकद असल्याचा संदेश या कार्यक्रमातून अधोरेखित झाला. प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन ना.मे.लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेच्या वतीने करण्यात आले.

# अल निनो संकटाचा सामना; शेतकऱ्यांची सतर्कता आवश्यक

'अल निनो ' हा शब्द महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांनी समजून घेणे आवश्यक आहे. अल निनो हे एक वातावरणीय संकट असून आता या संकटाच्या आम्ही जवळ असून याचा सर्वाधिक परिणाम जून मध्ये मृग आणि रोहिणी नक्षत्रावर झाला आहे. तो पुढेही होऊ शकतो. त्यामुळे या लेखात, चला! 'अल निनो 'या वातावरणातील बदलाच्या संकटाला सोप्या भाषेत समजून घेऊया!

राज्यातील शेतकऱ्यांनी हे बदल समजून घेऊन हवामान व कृषी खात्याच्या सूचनांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच सर्वसामान्य नागरिकांनी देखील या संदर्भात पुढील काळाचे नियोजन करणे आवश्यक आहे. चला! सोप्या भाषेत हा विषय समजून घेऊया !

हवामान बदल, वाढते तापमान, अनियमित पर्जन्यमान आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे शेती क्षेत्रासमोर नवी आव्हाने उभी राहत आहेत. या आव्हानांमध्ये 'अल निनो ' ही जागतिक हवामानाशी संबंधित घटना विशेष महत्त्वाची मानली जाते. जागतिक हवामान संघटना (WMO), भारत हवामान विभाग (IMD), संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना (FAO) आणि विविध संशोधन संस्थांच्या अभ्यासानुसार अल निनोचा प्रभाव केवळ हवामानापुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचा परिणाम शेती, जलसंपदा, पशुधन, आरोग्य, जैवविविधता आणि अर्थव्यवस्थेवरही होतो. त्यामुळे या घटनेचे स्वरूप समजून घेणे आणि त्यासाठी पूर्वतयारी करणे अत्यंत आवश्यक आहे.

**अल निनो म्हणजे काय? :**
अल निनो हा स्पॅनिश शब्द असून त्याचा अर्थ लहान मुलगा असा होतो. वैज्ञानिक भाषेत सांगायचे झाल्यास, प्रशांत महासागराच्या मध्य आणि पूर्व भागातील समुद्रपृष्ठाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढते, तेव्हा अल निनो स्थिती निर्माण होते. ही घटना ENSO (El Niño Southern Oscillation) या जागतिक हवामान प्रणालीचा भाग आहे. आता हे कसे होते हे जाणून घेऊया ! समुद्रातील तापमानातील या बदलांमुळे जगभरातील वाऱ्यांचे प्रवाह, ढगांची निर्मिती आणि पर्जन्यमानाचे स्वरूप बदलते. त्यामुळे काही भागात दुष्काळ, तर काही भागात अतिवृष्टीसारख्या घटना घडू शकतात.

**अल निनो दरवर्षी येतो का? :** नाही. जागतिक हवामान संघटनेच्या माहितीनुसार अल निनो साधारणतः दर दोन ते सात वर्षांनी उद्भवतो. त्याचा कालावधी साधारण नऊ महिने ते एक वर्ष किंवा काही वेळा त्याहून अधिक असू शकतो. प्रत्येक अल निनोची तीव्रता आणि परिणाम सारखेच असतील असे नाही.

**भारतावर यापूर्वी काय परिणाम झाला? :** भारतातील शेतकरी, पर्यावरण तज्ञ, जलतज्ञ, वनतज्ञ, कृषी तज्ञांसाठी अल निनो हा शब्द आता अपरिचित राहिलेला नाही. भारतातील मान्सून आणि अल निनो यांचा संबंध अनेक दशकांपासून अभ्यासला जात आहे. १९८२, १९८७, २००२, २००९ आणि २०१५ या वर्षांमध्ये भारताने कमी पावसाचा अनुभव घेतला होता. विशेषतः २००२ आणि २००९ मध्ये देशातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे गेल्या वर्षी जसा तुफान पाऊस झाला किंवा त्या वर्षापूर्वीही जसा पूरक पाऊस झाला तसा पाऊस यावर्षी नाही ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे.

तथापि, हवामान तज्ञ स्पष्ट करतात की प्रत्येक अल निनो वर्षात दुष्काळ पडेलच असे नाही. भारतीय महासागरातील तापमान, अरबी समुद्रातील स्थिती, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाची क्षेत्रे आणि इतर हवामान घटकही मान्सूनवर प्रभाव टाकतात.

**हवामान तज्ञांचे काय मत आहे? :** जागतिक हवामान संघटना (WMO), भारत हवामान विभाग (IMD), संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना (FAO) आणि इतर संशोधन संस्थांच्या मते अल निनो हा जागतिक हवामान व्यवस्थेतील नैसर्गिक भाग आहे. मात्र जागतिक तापमानवाढीमुळे त्याचे परिणाम अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हवामान तज्ञांच्या मते, अल निनोमुळे जागतिक सरासरी तापमान वाढू शकते. उष्णतेच्या लाटांची तीव्रता वाढू शकते. काही भागात दुष्काळ तर काही भागात अतिवृष्टी होऊ शकते. अन्नसुरक्षा आणि जलसुरक्षेवर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत पेरणीच्या नियोजनासाठी हवामान अंदाजांचे महत्त्व अधिक वाढते.

**'अल निनो' परिणाम रोखण्यासाठी प्रयत्न :** अल निनो ही नैसर्गिक महासागरीय घटना आहे, त्यामुळे यावर्षी अनेक बाबतीत अनियमितता घडू शकते. अशा परिस्थितीत परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जातात. साधारणत: अशावेळी शासन स्तरावर हवामानाचा सतत अभ्यास आणि पूर्वसूचना प्रणाली विकसित व कार्यक्षम केली जाते, जलसंधारण प्रकल्प राखीव ठेवले जातात. पीक विमा योजनेचा लाभ घेण्याचे सुचविले जाते. दुष्काळ व्यवस्थापन आराखडे तयार केले जातात, सूक्ष्म सिंचनाला प्रोत्साहन दिले जाते, हवामान आधारित कृषी सल्ला सेवा दिली जाते, बियाणे व चारा उपलब्धतेचे नियोजन करणे, जलाशय व्यवस्थापन आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन या काळात शासनामार्फत केले जाते.

**सामान्य नागरिकांनी काय करावे? :** अल निनोचा परिणाम केवळ शेतकऱ्यांवरच होतो असे नाही. तर या वातावरणाच्या बदलातून सर्वसामान्य प्रत्येक नागरिकाला जावे लागणार आहे. त्यामुळे हा अल निनो काय हे प्रत्येकाने जाणून घेणे आवश्यक आहे. सामान्य नागरिकांनी अशा परिस्थितीत, पाण्याची बचत करावी, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करावे. स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण करावे. उष्णतेच्या लाटांपासून बचावासाठी आवश्यक काळजी घ्यावी. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करावा.

**मृग नाही म्हणजे अल निनोचा प्रभाव काय :** हे उत्तर सध्या नाही असे आहे. कारण भारतात अनेक वेळा उशिरा पावसाला सुरुवात होते. भारतीय हवामान विभागाच्या मते मान्सूनचे आगमन आणि त्यातील खंड अनेक घटकांवर अवलंबून असतात. अरबी समुद्रातील परिस्थिती, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाची क्षेत्रे, पश्चिमी वारे, स्थानिक तापमान आणि इतर महासागरीय घटक यांचाही प्रभाव असतो. म्हणूनच जून महिन्यात काही दिवस पाऊस उशिरा येणे किंवा खंड पडणे यामागे केवळ 'अल निनो 'च कारणीभूत आहे, असे निश्चितपणे म्हणता येत नाही. तथापि यासंदर्भात हवामान शास्त्रज्ञांनी यावर्षी पाऊस उशिरा होईल अशी सूचना केली आहे. 'अल निनो' च्या प्रभावाबाबत काही कालावधीनंतर हवामान खाते मत व्यक्त करणार आहे तथापि, पाऊस उशिरा येणार हे निश्चित. अधिकृत हवामान विभागाच्या निरीक्षणांवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे.

**शासनाच्या उपाय योजना :** महाराष्ट्र शासनाने जलयुक्त शिवार, जलसंधारण प्रकल्प, सूक्ष्म सिंचन प्रोत्साहन, पीक विमा, हवामान आधारित कृषी सल्ला आणि दुष्काळ व्यवस्थापन यांसारख्या उपाययोजनांवर भर दिला आहे. शासन सातत्याने हवामान परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. राज्य शासनाने संभाव्य जल संकटामुळे धरणातील पाणी पिण्यासाठीच राखीव ठेवण्याची महत्त्वाची सूचना केली आहे. सिंचनासाठी पाणी उपसा बंदी लागू केली आहे. धरणातून कालव्यातून नद्या आणि तलावांमधून होणाऱ्या अधिक अनधिकृत व बेकायदेशीर पाणी उपसा तातडीने बंद करण्याचे निर्देश दिले आहे. तसेच वेळोवेळी आवश्यकतेनुसार जिल्हास्तरावर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात येणार आहे.

**शेतकऱ्यांनी काय करावे :** शासन स्तरावर हे सर्व निर्णय घेतले जात असताना आपल्या शेतकऱ्यांनी या परिस्थितीत काय करावे यासंदर्भात कृषी तज्ञांनी मार्गदर्शन केले आहे. कृषी तज्ञांच्या मते अल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून शेतकऱ्यांनी पुढील बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे

**१. हवामान अंदाजांवर लक्ष ठेवावे**
भारत हवामान विभाग आणि कृषी विभागाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे.

**२. पीक निवडीचे नियोजन करावे**
कमी कालावधीत येणारी आणि कमी पाण्यात तग धरणारी पिके निवडण्याचा विचार करावा.

**३. जलसंधारणाला प्राधान्य द्यावे**
शेततळे, बांधबंदिस्ती, पावसाचे पाणी साठवणे, चर निर्माण करणे, शेत व शेत रस्त्याच्या मध्ये पाणी साठवणे, ओलसरपणा राहिली, मूलस्थानी जलसंधारणासाठी प्रयत्न करणे.

**४. उपलब्ध जलस्तोत्रातून फक्त सूक्ष्म,** ठिबक आणि तुषार सिंचनाद्वारे पाण्याचा कार्यक्षम वापर करणे.

**५. पीक विमा घ्यावा**
नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळण्यासाठी हे सर्वात आवश्यक आहे.

**६. पशुधन व्यवस्थापन**
चारा आणि पाण्याची उपलब्धता याचे पूर्वनियोजन करणे आवश्यक आहे.

**७. सर्वात महत्त्वाचे म्हणजे** कृषी विभागाने सांगितल्याशिवाय पेरणी न करणे कारण या परिस्थितीत दुबार, तिबार पेरणीची शक्यता असते.

**मुख्यमंत्र्यांकडून शेतकऱ्यांना सूचना :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात हवामान विभाग व राज्याच्या व केंद्राच्या कृषी विभागाशी सल्लामसलत करून शेतकऱ्यांसाठी पेरणीची घाई न करण्याच्या संदेश दिला आहे. अल निनो मुळे पावसात खंड पडू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, कृषी विभागाच्या सल्ल्यानेच पेरणी करावी, अशी सूचना त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांनी घाबरून न जाता अधिकृत हवामान अंदाज, कृषी विद्यापीठांचे मार्गदर्शन आणि कृषी विभागाच्या सूचनांच्या आधारे निर्णय घेण्याचे आवाहन केले आहे.
थोडक्यात, अल निनो ही जगभर परिणाम घडवणारी नैसर्गिक हवामान घटना असली तरी ती अटळ संकट नाही. विज्ञानाधारित नियोजन, अचूक हवामान अंदाज, जलसंधारण, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि शासन-जनसहभाग यांच्या मदतीने तिच्या परिणामांची तीव्रता मोठ्या प्रमाणात कमी करता येते. शासनाकडून होणाऱ्या वेळोवेळी सूचना भीती निर्माण करण्यासाठी नाहीत. तर जागरूकता वाढविण्याची आहे. शाश्वत जलव्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण आणि हवामान अनुकूल शेती हीच अल निनोसारख्या आव्हानांना सामोरे जाण्याची सर्वात प्रभावी दिशा ठरू शकते. त्यामुळे शेतीच्या कोणत्याही कामाला सुरुवात करण्यापूर्वी कृषी विभागाच्या व हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी त्यासाठी सतर्क असणे सर्वात महत्त्वाचे आहे.

**कोणत्या देशांवर अल निनोचा प्रभाव ? :** अल निनोचा प्रभाव जागतिक स्वरूपाचा असतो. विशेषतः खालील देश यावर्षी अधिक प्रभावित होणार आहे. यामध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, अमेरिका, ब्राझील, दक्षिण आफ्रिकेतील काही देश, फिलिपाईन्स, पॅसिफिक महासागरातील बेट राष्ट्रे यांच्यावर अधिक संकट कोसळू शकते. काही भागात दुष्काळ, काही भागात पूर आणि काही ठिकाणी समुद्री परिसंस्थांवर परिणाम दिसून येतो.

**कोणती राज्ये अधिक संवेदनशील? :** अल निनोच्या काळात पावसातील तफावत सर्वाधिक जाणवणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड यांचा उल्लेख केला जातो. तथापि, प्रत्येक वर्षी परिस्थिती वेगळी असू शकते. त्यामुळे या प्रदेशावर अधिक लक्ष भारतीय हवामान खात्याने केले असून त्या दृष्टीने नियोजन सुरू आहे.

प्रवीण टाके
उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर ९७०२८५८७७७

# माहितीचा अधिकार हा व्यवसाय नव्हे, लोकशाहीचा श्वास आहे

माहितीचा अधिकार कायदा आता २१ वर्षांचा झाला आहे. या दोन दशकांहून अधिक काळात या कायद्याने अत्यंत खडतर प्रवास केला आहे. अनेक अडथळे, विरोध, विलंब, दबाव आणि सत्ताधाऱ्यांच्या नाराजीचा सामना करत हा कायदा आजही सामान्य नागरिकांच्या हातातील सर्वात प्रभावी लोकशाहीचे साधन म्हणून उभा आहे. या कायद्यामुळे नागरिक अधिक सक्षम झाले आहेत आणि प्रशासन अधिक पारदर्शक होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. म्हणूनच माहितीचा अधिकार हा केवळ एक कायदा नसून लोकशाहीचा श्वास आहे.

अशा वेळी सर्वोच्च न्यायालयाने 'आरटीआय कार्यकर्तेपणा हा नवीन व्यवसाय झाला आहे' अशी केलेली टिप्पणी अनेकांना खटकणारी आहे. देशात भ्रष्टाचार, गैरव्यवहार, सार्वजनिक पैशांची उधळपट्टी आणि प्रशासनातील अनियमितता उघड करणारे अनेक आरटीआय कार्यकर्ते जीव धोक्यात घालून काम करतात. अनेकांनी हल्ले सहन केले, काहींनी प्राणही गमावले. अशा परिस्थितीत संपूर्ण आरटीआय चळवळीला ङ'व्यवसाय'ङ म्हणून संबोधणे लाखो प्रामाणिक कार्यकर्त्यांवर अन्याय करणारे ठरू शकते. निश्चितच, काही व्यक्ती माहितीच्या अधिकाराचा गैरवापर करत असतील तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. मात्र काही अपवादांच्या आधारावर संपूर्ण चळवळीवर संशयाची सावली टाकणे योग्य नाही. कारण आरटीआयमुळेच अनेक घोटाळे उघड झाले, अनेक बेकायदेशीर कृत्ये समोर आली आणि सामान्य नागरिकांना न्याय मिळाला आहे. माहितीचा अधिकार हा सरकारने दिलेला उपकार नाही. भारतीय संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, पारदर्शक प्रशासन आणि उत्तरदायी शासन व्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे. शासन आणि प्रशासन यांना जनतेसमोर जबाबदार धरण्याचे हे प्रभावी साधन आहे. त्यामुळे आरटीआय कार्यकर्ते हे व्यवस्थेचे शत्रू नसून लोकशाहीचे पहारेकरी आहेत. शासनालाही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आजही अनेक शासकीय कार्यालयांमध्ये माहिती देण्यास टाळाटाळ केली जाते, अर्जदारांना त्रास दिला जातो आणि पारदर्शकतेपेक्षा गोपनीयतेला प्राधान्य दिले जाते. याहून गंभीर बाब म्हणजे शासकीय कार्यालयांमधील लाचखोरी हा अनेक ठिकाणी एक प्रकारचा 'व्यवसाय' बनल्याची भावना सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. एखादे काम नियमांनुसार आणि वेळेत होण्याऐवजी पैशांच्या जोरावर वेगाने होते, अशी तक्रार वारंवार ऐकायला मिळते. मग प्रश्न असा उपस्थित होतो की, माहिती मागणाऱ्या नागरिकांवर आणि आरटीआय कार्यकर्त्यांवर कठोर शब्दांत टिप्पणी केली जाते, पण प्रशासनातील भ्रष्टाचार, लाचखोरी आणि माहिती दडपण्याच्या प्रवृत्तीवर तितक्याच कठोर शब्दांत भाष्य का होत नाही? जनतेला उत्तरदायी असलेल्या व्यवस्थेने प्रश्न विचारणाऱ्यांकडे संशयाने पाहण्याऐवजी भ्रष्टाचाराच्या मुळांवर प्रहार करणे अधिक आवश्यक आहे. लोकशाहीत सत्तेला प्रश्न विचारणारा नागरिक हा शत्रू नसतो; तो व्यवस्थेचा सजग भागीदार असतो. शासन, प्रशासन आणि न्यायव्यवस्था यांची प्रतिष्ठा तेव्हाच वाढते जेव्हा ते टीका ऐकून घेतात, आत्मपरीक्षण करतात आणि उत्तरदायित्व स्वीकारतात. माहितीचा अधिकार हा कोणाचा व्यवसाय नाही; तो जनतेचा घटनात्मक अधिकार आहे. २१ वर्षांच्या या खडतर प्रवासाने हे सिद्ध केले आहे की आरटीआयमुळे नागरिक सक्षम झाले आहेत, प्रशासन अधिक जबाबदार बनले आहे आणि लोकशाही अधिक मजबूत झाली आहे. माहितीचा अधिकार चळवळीचा अवमान करण्याऐवजी तिला अधिक बळकटी देणे, प्रामाणिक कार्यकर्त्यांचे संरक्षण करणे आणि प्रशासनातील भ्रष्टाचारावर कठोर कारवाई करणे हीच काळाची गरज आहे. कारण माहितीचा अधिकार हा व्यवसाय नव्हे, तर लोकशाहीचा श्वास आहे.


**धनंजय रमेश मोरे,** अकोट

**CHANGE OF NAME**
I have changed my old name from
**MOHD SUZAIN ABDUL RAHEMAN**
gagget no- (N-2612488)
new name
**ZAIN SHEIKH ABDUL RAHEMAN**
- Address -
Mankarna Plot, Near Star Complex, Akola
Mo.No: 9325516720

## दिन विशेष
## गोवा क्रांती दिन

दरवर्षी १८ जून रोजी साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व आणि इतिहास प्रेरक आहे. १८ जून १९४६ रोजी डॉ. राम मनोहर लोहिया आणि डॉ. जूलियाओ मेनेजेस यांनी दक्षिण गोवा मधील 'मार्गाओ' येथे पोर्तुगाली राजवटीविरुद्ध एका ऐतिहासिक आंदोलनाची (सविनय कायदेभंग) सुरुवात केली होती.आवाहन: या दिवशी डॉ. लोहिया यांनी गोवेकरांना पोर्तुगाली हुकूमशाहीविरुद्ध एकत्र येऊन आपल्या हक्कांसाठी आवाज उठवण्याचे आवाहन केले होते.

गोवा मुक्तीचा पाया घातला गेला. या क्रांतीने गोव्यातील जनतेमध्ये स्वातंत्र्याची ठिणगी पेटवली, ज्याचा अंतिम परिणाम म्हणून १९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा पोर्तुगाली राजवटीतून मुक्त झाला.या ऐतिहासिक दिवशी गोवा राज्यात स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण केले जाते आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांच्या




बलिदानाला आदरांजली वाहिली जाते.

गोवा मुक्ती संग्रामात महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सेनानी सामील झाले होते. गोवा मुक्ती साठी त्यांनी लढा दिला. पोर्तुगाली राजवटीतून गोव्याला मुक्ती मिळावी म्हणून लढा द्यावा लागला. विविध पातळीवर आंदोलन करण्यात आले. शेवटी एकजुटीचा विजय झाला आणि गोवा मुक्त झाला. गोव्यातील लोहिया मैदानावरील स्मारक क्रांतीचे स्मरण करून देते.

# सेवा सहकारी सोसायट्यांच्या बळकटीकरणासाठी तरूण शेतकऱ्यांनी पुढे यावे : डॉ. जयराज कोरपे

## आगर सेवा सहकारी सोसायटी कार्यालयाचे उद्घाटन

प्रतिनिधी १८ जून

**अकोला :** ग्रामीण भागातील सेवा सहकारी सोसायट्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्विकार करून अधिक सक्षम, लोकाभिमुख आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनले पाहिजे असे प्रतिपादन अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे यांनी केले.



आगर येथे १७ जून रोजी आयोजित भव्य सत्कार सोहळा व नवीन सोसायटीचे कार्यालयाचे उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सेवा सहकारी सोसायटी पाळोदी, खांबोरा, नवथळ खेकडी, बादलापूर, लोणाग्रा, तसेच ग्रामपंचायत आगर, जनता एज्युकेशन सोसायटी, आगर महात्मा फुले विद्यालय सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या वतीने बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे यांचा भव्य सत्कार करण्यात आला. युवा शेतकऱ्यांनी यामध्ये सक्रीय होवून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा व्हावे असे आवाहन त्यांनी केले.

ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात सेवा सहकारी सोसायट्यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. बदलत्या काळानुसार डिजिटल तंत्रज्ञान, पारदर्शक प्रशासन आणि युवकांचा सहभाग वाढवून सहकार क्षेत्र अधिक मजबुत करणे आवश्यक आहे. सेवा सोसायट्यांचे सक्षमीकरणासाठी जिल्हा बँक विविध योजनांच्या माध्यमातून सातत्याने कार्यरत असल्याचे सांगत त्यांनी संपूर्ण व्याजमाफी योजना, सुर्यघर योजना, सोसायटी इमारत अर्थसहाय्य योजना आदी उपक्रमांची माहिती दिली. नवीन इमारतीमुळे सोसायटीच्या कामकाजाला अधिक गती मिळणार असून भागधारक व शेतकऱ्यांना आधुनिक व दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार आहे असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष धोत्रे, राजेंद्रजी काळणे, विष्णुपंत बारकरी यांनी समयोचित मार्गदर्शन केले. व्यासपिठावर उपस्थित कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती ज्ञानेश्वराव महल्ले, अकोला व वाशिम जिल्हा प्राथमिक कृषी सहकारी पत संस्थांचा संघ मर्या., अकोला चे संचालक अंबादास तेलगोटे, निळकंठराव खेळकर अकोला, सुरेशजी सनगाळे, गजानन पारधी, श्रीमती सुशिलाबाई खोले (सरपंच) अभिमन्यु बक्ते, ज्ञानेश्वर काळणे, किशोर महाराज खोले उपस्थित होते.

तसेच यावेळी कार्यक्रमास उपस्थित विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, संचालक मंडळ सदस्य, सभासद शेतकरी आणि खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे उपमुख्याधिकारी रविंद्र थोरात यांनी केले तसेच सुत्र संचालन व आभार प्रदर्शन आशुतोष काळणे यांनी केले.

# 'त्या' सहा खासदारांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन

## उद्धवसेनेचे धिंग्रा चौकात उग्र आंदोलन; भाजपवर निशाणा

प्रतिनिधी १८ जून



**अकोला :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेल्या सहा खासदारांनी १७ जून रोजी दिल्ली येथे शिंदेसेनेत प्रवेश केल्याचे समोर येताच उद्धवसेनेच्या शिवसैनिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. बुधवारी उद्धवसेनेच्यावतीने मदनलाल धिंग्रा चौकात सायंकाळी ५ वाजता 'त्या' सहा खासदारांविरोधात उग्र निदर्शने करीत त्यांचा प्रतिकात्मक पुतळा पायदळी तुडवीत त्याचे दहन केले.

पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात सन २०२४ मध्ये पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत निवडून आलेल्या सहा खासदारांनी बुधवारी दिल्ली गाठत शिंदेसेनेत प्रवेश घेतला. हा प्रकार समोर येताच राज्यभरातील शिवसैनिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.


या खासदारांनी घेतलेल्या निर्णयाचा निषेध व्यक्त करण्यासाठी शिवसेनेचे शहर प्रमुख (अकोला पश्चिम) आशिष गावंडे यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले. मध्यवर्ती बस स्थानकासमोरील हुतात्मा मदनलाल धिंग्रा चौकात सहा खासदारांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करून शिंदेसेनेच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. या आंदोलनात उपजिल्हाप्रमुख सुरेंद्र विसपुते, जिल्हासंघटक भूषण भिरड, अकोला पूर्वचे शहर प्रमुख राहुल कराळे, मनपा गटनेता विजय इंगळे, नगरसेवक शंकर लंगोटे, युवासेना जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक अभय खुमकर, अभिषेक खरसाडे, किरण अवताडे, साकलेन खान पठाण, दत्ता पाटील, आशु तिवारी, सोनू औतकार, अनिल परचुरे, प्रवीण शिंदे, योगेश गोतमारे, विशाल घरडे, विकी इंगळे, सोनू अत्तरकर, शुभम देशमुख, ऋषी देशमुख, हर्षल पाटील, रामभाऊ आमले, आजी-माजी पदाधिकारी, विभाग प्रमुख, प्रभाग प्रमुख आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### मतदारसंघ पुनर्रचनेसाठी कटकारस्थान

मध्यंतरी केंद्रात भाजपने मतदारसंघांची पुनर्रचना व महिलांना आरक्षण देण्याचे विधेयक सादर केले असता ते पुरेशा संख्या बळाअभावी नामंजूर झाले होते. तेव्हापासून विविध राजकीय पक्षांतील खासदारांना फोडण्यासाठी भाजपने कटकारस्थान रचल्याचा आरोप शहरप्रमुख आशिष गावंडे यांनी केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे केवळ निमित्तमात्र असल्याचा टोला त्यांनी लगावला.

# नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर यशस्वी उपचार

प्रतिनिधी १८ जून




**अकोला :** येथील प्रसिद्ध 'डॉ. नाईक होमिओपॅथी'मध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, आर्थ्रायटिस (सांधेदुखी) आणि मायग्रेनसारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी व आनंदी जीवन जगत आहेत. येथील 'ॲडव्हान्स होमिओपॅथी' उपचारांमुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.

गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जातात. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही काहीही फरक पडलेला नाही, त्यांनी एकदा या केंद्राला नक्की भेट दिली पाहिजे. अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, अथवा आणि त्यांच्या ँव्द्दस्दादर्ड्रूब.म्दस (भ्दल्लूं) युट्युब चॅनेलवरही अधिक माहिती मिळवू शकतात.येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या आरती नावाच्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव शेअर करताना सांगितले.

### उपचारांचा लाभ झाल्याचा रुग्णांचा दावा

माझे नांव लता, हिंगोली येथे राहते. मला नाईक होमिओपॅथी येण्याअगोदर थायरॉईडचा त्रास होता. खुप घाम यायचा थोडे जरी चालले, पाय-या चढले की जीव घाबरायचा, शरीर खुप भारी वाटायचे.

नाईक होमिओपॅथी मध्ये उपचार सुरू केला आणि १ महिन्यातच माझे ५ किलो वजन कमी झाले. मला घाम, जीव घाबरण्याचा त्रास कमी झाला. या १ महिन्यात मला ५० टक्के फायदा झाला. नाईक होमिओपॅथी उपचाराने मी समाधानी आहे.

# कार्यालयात घुसून कर्मचाऱ्यावर पाइपने हल्ला

**मूर्तिजापूर :** पगाराच्या पैशांवरून झालेल्या वादातून एका कर्मचाऱ्याला जीवे मारण्याची धमकी देत कार्यालयात घुसून लोखंडी पाइपने मारहाण केल्याची घटना तालुक्यातील अनभोरा शिवारातील राधे राधे स्टोन क्रेशर येथे घडली. या प्रकरणी मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. फिर्यादी सौरभ सुधाकर बोर्डे (४१), रा. कोळंबी, हे खासगी नोकरी करतात. १५ जून रोजी सायंकाळी आरोपी गोपाल उर्फ बाबू कोकाटे रा. अनभोरा याने फिर्यादी यांना दूरध्वनीवर संपर्क साधून पगाराचे पैसे कमी का जमा केले, असा जाब विचारला. त्यानंतर कार्यालयात येऊन पाइपने मारहाण केली. जखमी फिर्यादी यांनी वैद्यकीय उपचार घेतल्यानंतर १६ जून रोजी मूर्तिजापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# महाराणा प्रताप जयंती उत्सव उत्साहात साजरा

प्रतिनिधी १८ जून

**अकोला :** वीर शिरोमणी, राष्ट्र गौरव आणि क्षत्रिय कुलभूषण महाराणा प्रताप यांच्या जयंतीच्या पावन पर्वावर अकोला येथे भव्य आयोजन करण्यात आले होते. समस्त राजपूत समाजाच्या वतीने आयोजित या उत्सवामध्ये समाजबांधव आणि महिलांची मोठी उपस्थिती होती.

सकाळी महाराणा प्रताप चौक येथील पुतळ्याला समाजबांधवांतर्फे विधिवत पूजा-अर्चा करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित महिलांनीही महाराणा प्रताप यांच्या पुतळ्याचे पूजन करून आदरांजली वाहिली. पुतळा पूजनानंतर आनंदसिंग रघुवंशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाला खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, नगरसेविका उषा विरक, जयंत म्हसने, नगरसेविका कल्पना गोटफोडे, किशोर मंगटे पाटील, डॉ. अजयसिंग चौहान, विनोदसिंग ठाकूर, बादलसिंग ठाकूर, बलवीरसिंग ठाकूर बाळापूर यासह समाजातील अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.



या सोहळ्याचे औचित्य साधून वर्ष २०२६ मधील गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये इयत्ता १० वी आणि १२ वीच्या परीक्षांमध्ये उत्कृष्ट गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यानंतर, समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना 'समाज भूषण सन्मान' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यात समाजबांधव राजपूतपुरा येथील मंदिरात पोहोचले, जिथे पूजा-अर्चा करण्यात आली. यानंतर सर्व समाजबांधव कौलखेड येथे आयोजित भव्य पुतळा पूजन आणि सामाजिक कार्यक्रमात सहभागी झाले.

सायंकाळी महाराणा प्रताप बाग येथून भव्य शोभायात्रेचा शुभारंभ झाला. या शोभायात्रेत मोठ्या संख्येने क्षत्राणी पारंपरिक राजपुती पोशाखात सहभागी झाल्या होत्या, ज्यामुळे कार्यक्रमाची शोभा आणखीनच वाढली. शोभायात्रा अत्यंत भव्य, आकर्षक आणि शिस्तबद्ध होती. शहरात ठिकठिकाणी विविध सामाजिक संस्था आणि समाजांमार्फत या शोभायात्रेवर पुष्पवृष्टी करून, स्वागत व सत्कार करत तिचे अभिनंदन करण्यात आले.

शोभायात्रेचे मुख्य आकर्षण: महिलांनी सादर केलेली विविध साहसी आणि पारंपरिक खेळांची मनमोहक प्रात्यक्षिके हे या शोभायात्रेचे मुख्य आकर्षण होते, ज्याचे नागरिकांनी भरभरून कौतुक केले. ही भव्य शोभायात्रा पुन्हा महाराणा प्रताप बाग येथे पोहोचून संपन्न झाली. महाराणा प्रताप सेवा समिती आणि अखिल भारतीय क्षत्रिय महासभेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समस्त अकोला राजपूत समाजाने परिश्रम घेतले.

# अघोरी प्रथेचा संशयित प्रकार, सखोल तपास करावा

## दहीहंडा पोलीस स्टेशन अंतर्गत घटना आली समोर

प्रतिनिधी १८ जून

**अकोला :** जिल्ह्यातील दहीहंडा पोलीस स्टेशन हद्दीतील काटी गावात अघोरी प्रथेचा संशयित प्रकार समोर आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. तीन दिवसांपूर्वी निधन झालेल्या विनायक चराटे यांच्या अंत्यसंस्कारानंतर राख सावडण्यासाठी गेलेल्या नातेवाईकांना स्मशानभूमी परिसरात काही संशयास्पद साहित्य आढळून आल्याची माहिती आहे.

अकोला जिल्ह्यातील पूर्णा नदीच्या पात्रालगत असलेल्या स्मशानभूमीत विनायक चराटे यांच्या अंत्यविधीनंतर राख ठेवण्यात आली होती. आज कुटुंबीय राख सावडण्यासाठी गेले असता, त्याठिकाणी गावातील नातलग असलेले महादेव वासुदेव चराटे यांचा जिवंतपणीचा फोटो, हार, फुले, अत्तर, लिंबू, अंडी तसेच अन्य पूजा साहित्य आढळून आल्याचा दावा करण्यात आला आहे. या साहित्याचा वापर अघोरी प्रथेसाठी करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच अतुल महादेव चराटे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी या प्रकरणाची माहिती दहीहंडा पोलीस स्टेशनला दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. तसेच आढळून आलेल्या साहित्याची तपासणी करून पुढील चौकशी सुरू केली आहे. अतुल चराटे यांनी काही महिन्यांपूर्वी गावातील काही व्यक्तींशी वाद झाल्याचे सांगत या घटनेमागे त्याचा सहभाग असण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

# महेश नवमी उत्सवानिमित्त उद्यापासून भरगच्च कार्यक्रम

प्रतिनिधी १८ जून

**अकोला :** सकल माहेश्वरी समाजाचा वंशोत्पत्ती दिवस म्हणून महेश नवमी साजरी करण्यात येते. यंदा २३ जून रोजी महानगरातील सकल माहेश्वरी समाज महेश नवमी उत्सव साजरा करणार आहे. या उत्सव पर्वात माहेश्वरी भवनात १९ ते २३ जूनपर्यंत माहेश्वरी समाज ट्रस्ट, माहेश्वरी महिला मंडळ, प्रगती मंडळ, नवयुवती मंडळ, वरिष्ठ नागरिक प्रकोष्ठ तथा वरिष्ठ नागरिक महिला प्रकोष्ठच्या सहकार्याने विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती ट्रस्टचे प्रधानमंत्री विजय राठी, उत्सव प्रमुख नरेश बियाणी यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.



२३ जूनला सायंकाळी ५ वाजता महेश नवमीनिमित्त शोभायात्रा निघणार आहे. सदर शोभायात्रा राजराजेश्वर मंदिरापासून प्रारंभ होऊन सिटी कोतवाली, टिळक रोड, जुने कापड बाजार, गांधी चौक, तहसील चौक मार्गे माहेश्वरी भवन येथे पोहोचून येथे मुख्य नवमी कार्यक्रम होऊन मान्यवर समाजाला संबोधित करणार आहेत.

या सप्ताहात जिल्हा महिला रुग्णालयात फळ वितरण, नारी प्रतिभा स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, मॅरेथॉन स्पर्धा, रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम. नाटिका, जागतिक योग दिनानिमित्त माहेश्वरी भवनात योग शिबिर, हॅप्पी स्ट्रीट, बालकांसाठी क्रीडा स्पर्धा, 'उद्योग क्षेत्र विकास प्रोत्साहन' मार्गदर्शन, माहेश्वरी भवन, महेश भवन व इतर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम, स्तोत्र पठण, संगीतमय भजन उत्सव, शालेय पारितोषिक व सत्कार कार्यक्रम, 'डिजिटल रावण' नाटिका तथा प्रश्नमंजुषा कार्यक्रम, मिले सुर मेरा तुम्हारा ही संगीतमय मेजवानी खास आकर्षण ठरणार आहे.

यंदाच्या महेश नवमी उत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून जालना येथील मेटारोल इस्पातचे व्यवस्थापकीय संचालक द्वारकाप्रसाद सोनी तर पूजा यजमान म्हणून गोपाल व सरलादेवी पनपालिया राहणार आहेत. या उत्सवाचा प्रारंभ १९ जून रोजी सकाळी भगवान महेश यांच्या पूजनाने तर मुख्य नवमी सोहळा हा २३ जून रोजी होणार आहे. पत्रकार परिषदेला ट्रस्टचे अध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल, महिला मंडळ अध्यक्षा वंदना हेडा, प्रगती मंडळ अध्यक्ष सुरज काबरा, नवयुवती मंडळ अध्यक्ष नंदनी बजाज, वरिष्ठ नागरिक प्रकोष्ठ अध्यक्ष सुरेश माहेश्वरी, वरिष्ठ नागरिक महिला प्रकोष्ठ अध्यक्षा प्रमिला लाहोटी यांच्यासह वरिष्ठ नागरिक प्रकोष्ठ, वरिष्ठ नागरिक महिला प्रकोष्ठचे सर्व पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# जुन्या डीएड कॉलेज मधील काही तलाठी कार्यालयांना कुलूप

## वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज, प्रशासन कुठे आहे

प्रतिनिधी १८ जून

**अकोला :** तालुक्यातील शेतकऱ्यांना तसेच इतर नागरिकांना एकाच ठिकाणी त्यांना लागणारे सर्व कागदपत्रे उपलब्ध व्हावी या करिता जुन्या डीएड कॉलेजच्या इमारतीत तलाठी कार्यालय कार्यान्वित करण्यात आले होते, परंतु येथील काही तलाठी कार्यालय बंद असल्याने नागरिकांना आल्या पाहिजे परत जावे लागत आहे.

अकोला तालुक्यातील ग्रामीण तसेच शहरी भागात राहणाऱ्या नागरिकांना एकाच ठिकाणी सर्व कागदपत्रे मिळावी या करिता जुन्या डीएड कॉलेज च्या इमारत मध्ये काही तलाठी कार्यालय स्थापन करण्यात आले होते. यातील काही तलाठी कार्यालय हे बंद असल्याने या ठिकाणी आपल्या कागतपत्र्यांसाठी करता येणाऱ्या नागरिकांना कार्यालयाला कुलूप पाहू आल्यापाई परत जावे लागत आहे. सध्या खरीप हंगाम ची सुरुवात होणार आहे याकरिता शेतकऱ्यांना शेती विषयक कागदपत्रे लागतात तसेच शाळा सुद्धा काही दिवसात सुरू होणार असून पालकांना सुद्धा आपल्या पाल्यांकरिता कागदपत्रांची आवश्यकता असते यातच सदरचे तलाठी कार्यालय बंद असल्याने शेतकऱ्यांची तसेच पालकांची चांगलीच पायपीट होताना दिसून येत आहे. या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उचित कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

## निधन वार्ता

### अनिल बोराखडे



**अकोला :** वरिष्ठ इन्शुरन्स सर्वेअर, सामाजिक कार्यकर्ते अनिलराव बोराखडे यांचे १५ जूनला अल्पशा आजाराने नागपूर येथे निधन झाले.

अनिलभाऊ यांनी देहदान करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपुरला देहदान प्रक्रिया पूर्ण केली.

### ज्योत्स्नाताई महल्ले



**अकोला :** खरप बु. येथील रहिवासी सौ. ज्योत्स्नाताई प्रदीप महल्ले यांचे १७ जूनला सायंकाळी निधन झाले. गुरूवारी सकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे.

# दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ थांबवा - निलेश देव

## अकोट फाईल ते हनुमान चौक जुनी पाईपलाईन बदला

प्रतिनिधी १८ जून

**अकोला :** शहरातील नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठा मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार असून महानगरपालिकेची ती थेट जबाबदारी आहे. मात्र अकोट फाईल तीन खंबे (प्रताप मार्बल) ते हनुमान चौक या दरम्यानची अंदाजे १९०० मीटर जुनी १२ इंच पी.आय. पाईपलाईन आज अत्यंत जीर्ण, फुटक्या व धोकादायक अवस्थेत असून नागरिकांच्या आरोग्याशी गंभीर प्रकारे तडजोड होत असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे गटनेता निलेश देव यांनी केला आहे.

सन २००२ मध्ये शहरातील तत्कालीन पाणीटंचाई लक्षात घेऊन वारी जलयोजनेअंतर्गत ही पाईपलाईन टाकण्यात आली होती. मात्र त्यानंतर शहराची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली. सन २०२१ मध्ये अकोट फाईल तीन खंबे परिसरात नवीन पाण्याची टाकी उभारून नायगाव, शिवळा, भरत नगर, शंकर नगर, लाडीस फाईल, बापू नगर, पंचशील नगर, दम्माणी, न्यू तापडिया नगर, खरप, डुबे वाडी तसेच प्रभाग क्रमांक १, २ व ३ मधील



हद्दवाढ भागात पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. मात्र वाढलेल्या लोकसंख्येचा विचार न करता आजही संपूर्ण भागाला जुन्याच १२ इंच पाईपलाईनवर अवलंबून ठेवण्यात आले आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे अकोला–अकोट रस्ता विस्तारीकरणाच्या कामादरम्यान अनेक ठिकाणी नाल्यांचे बांधकाम या पाईपलाईनवरून करण्यात आले. परिणामी जवळपास संपूर्ण १९०० मीटर पाईपलाईन नाल्यांच्या खाली गेली असून अनेक ठिकाणी ती फुटलेली आहे.

प्रत्यक्ष स्थळ पाहणीमध्ये असे निदर्शनास आले की, फुटलेल्या पाईपलाईनमधून नाल्यातील दूषित पाणी मिसळून ते थेट नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचत आहे. हा प्रकार केवळ प्रशासनाचा निष्काळजीपणा नसून नागरिकांच्या आरोग्याशी सुरू असलेला गंभीर खेळ आहे. अशा परिस्थितीत जलजन्य आजार, संसर्गजन्य रोग व सार्वजनिक आरोग्य संकट निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

प्रशासनाने या विषयाकडे तातडीने लक्ष देऊन कार्यवाही करावी; अन्यथा नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नावर लोकशाही मार्गाने तीव्र जनआंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित एफ 5226
मॉ. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर, अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार
वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

# वैद्यकीय महाविद्यालय मार्गावरील खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका

प्रतिनिधी १८ जून

**यवतमाळ :** येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे जाणाऱ्या मार्गावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांसह रुग्णांना त्रास सहन करावा लागत आहे. वर्षभरापूर्वीच या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र, काही ठिकाणी अर्धा फूट खोल व सात ते आठ फूट रुंद खड्डे निर्माण झाले आहेत. हे खड्डे चुकविताना वाहनचालकांचा तोल जाऊन अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या मार्गावरून रुग्णवाहिकांची सतत ये-जा होत असल्याने रुग्णांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सिमेंट रस्ता संपल्यानंतर पाटबंधारे कार्यालयाकडे जाणाऱ्या वळणापर्यंत खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्यास परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने दुरुस्ती करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

# युवक काँग्रेस ते ठाकरे गट; आता शिंदे सेनेकडे देशमुखांची वाटचाल ?

## खा. संजय देशमुखांच्या पक्षांतराच्या चर्चेने खळबळ; कार्यकर्त्यांसमोर निष्ठेचा प्रश्न

प्रतिनिधी १८ जून

संदीप रत्नपारखी

**दिग्रस :** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा सुरू असतानाच खासदार संजय देशमुख यांच्या शिवसेना शिंदे गटात संभाव्य प्रवेशाच्या चर्चेने दिग्रससह यवतमाळ जिल्ह्यात राजकीय खळबळ उडाली आहे. अधिकृत घोषणा अद्याप झालेली नसली तरी या चर्चेमुळे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांमध्ये विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

विशेष म्हणजे, देशमुख यांच्यासोबत उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात गेलेले पदाधिकारी आणि कार्यकर्ते त्यांच्या नव्या राजकीय निर्णयासोबत जाणार की पक्षनिष्ठेला प्राधान्य देणार, याबाबत



उत्सुकता निर्माण झाली आहे. अनेक कार्यकर्त्यांनी वर्षानुवर्षे पक्षाच्या विचारसरणीशी निष्ठा राखत काम केले आहे. त्यामुळे 'नेत्यासोबत की पक्षासोबत' असा पेच अनेकांसमोर उभा राहिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

> ■ देशमुख यांच्या पुढील राजकीय भूमिकेबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नसली तरी त्यांच्या संभाव्य प्रवेशाच्या चर्चेने दिग्रस आणि यवतमाळ जिल्ह्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. येत्या काही दिवसांत या घडामोडींचा नेमका काय परिणाम होतो, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

देशमुख यांच्या राजकीय प्रवासाचीही या निमित्ताने चर्चा होत आहे. युवक काँग्रेसपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास शिवसेना, अपक्ष, काँग्रेस, भाजप, उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि आता शिंदे गटापर्यंत पोहोचणार का, याविषयी राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत. वारंवार पक्षबदलाच्या चर्चेमुळे काही मतदार आणि कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असल्याचेही बोलले जात आहे.

'कार्यकर्ते पक्षाशी निष्ठावान राहतात, मग नेते का नाही?' असा सवाल अनेक नागरिकांकडून उपस्थित केला जात असल्याची चर्चा आहे. वारंवार बदलणाऱ्या राजकीय भूमिकेमुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याचे मतही व्यक्त केले जात आहे.

दुसरीकडे, जिल्ह्यातील राजकीय प्रभाव कायम राखण्यासाठी तसेच आगामी राजकीय समीकरणांचा विचार करून हा निर्णय घेतला जात असल्याचा अंदाज राजकीय निरीक्षक व्यक्त करीत आहेत.

जिल्ह्यात उभारलेले राजकीय वर्चस्व आणि संघटनात्मक ताकद टिकवून ठेवण्यासाठी महायुतीत सहभागी होण्याची रणनीती आखली जात असल्याचीही चर्चा आहे.

मात्र, या चर्चेची दुसरी बाजूही समोर येत आहे. काही शिवसैनिकांच्या मते, देशमुख यांच्यासारख्या प्रभावी नेत्याच्या संभाव्य आगमनामुळे जिल्ह्यातील शिवसेनेला नवी ऊर्जा मिळू शकते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटना अधिक मजबूत होऊन पक्षाला बळकटी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# उमरखेड उपजिल्हा रुग्णालयातील २० अधिकारी-कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

## जिल्हा शल्यचिकित्सकांच्या अचानक भेटीत गैरहजेरी उघड; रुग्णसेवेबाबत प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी १८ जून



**उमरखेड :** येथील उपजिल्हा रुग्णालयातील कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. जिल्हा शल्यचिकित्सकांनी केलेल्या अचानक पाहणीत तब्बल २० अधिकारी व कर्मचारी ड्युटीवर अनुपस्थित आढळल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. या कारवाईमुळे रुग्णालय प्रशासनात खळबळ उडाली आहे.

उपजिल्हा रुग्णालयात औषधांचा तुटवडा, अपुऱ्या सुविधा तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीच्या तक्रारी सातत्याने होत होत्या. या पार्श्वभूमीवर जिल्हा शल्यचिकित्सक राठोड यांनी ६ जून रोजी रुग्णालयाला अचानक भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. यावेळी ड्युटी रोस्टरनुसार उपस्थित असणे अपेक्षित असलेले अनेक अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्षात गैरहजर असल्याचे आढळून आले.

गैरहजर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून अनुपस्थितीबाबत खुलासा मागविण्यात आला असून त्यांना कारणे दाखवा नोटिसा देण्यात आल्या आहेत. या प्रकारामुळे रुग्णसेवेवर परिणाम होत असल्याची बाबही समोर आली आहे.

> ■ खुलासा मागविण्यात आलेल्यांमध्ये डॉ. कपाळे, डॉ. मोरे, डॉ. जहागीर, डॉ. नरवटे, डॉ. गोरे, डॉ. गायकवाड, डॉ. रावते, डॉ. जाधव, डॉ. कलमुर्ग, डॉ. लोमाटे, डॉ. विरखडे यांच्यासह साधना चल्नावार, अनिता फुटाणे, सुनील सुकळकर, कल्पना विरुळकर, रत्नमाला चोटपल्लीवार, वैशाली धोंगडे, अनंत शिंदे, आशिष जगताप आणि रिना देशमुख यांचा समावेश असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

दरम्यान, जिल्हा शल्यचिकित्सकांनी केलेल्या कारवाईचे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांकडून स्वागत होत आहे. निष्काळजीपणा करणाऱ्यांवर केवळ नोटिसांपुरतीच कारवाई न करता कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही नागरिकांमधून होत आहे.

# पुनर्वसनाच्या मागणीसाठी देवसरी पूरग्रस्तांचा एसडीओ कार्यालयावर मोर्चा

प्रतिनिधी १८ जून



**उमरखेड :** तालुक्यातील देवसरी येथील पूरग्रस्त नागरिकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्याच्या मागणीसाठी बुधवारी (दि. १७) उपविभागीय अधिकारी (एसडीओ) कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. बाळदी रोडवरील मंजूर पुनर्वसन जागेवरील रखडलेली विकासकामे तातडीने पूर्ण करावीत, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.

देवसरी येथील पूरग्रस्तांच्या सुरक्षित पुनर्वसनासाठी शासनाने बाळदी रोड परिसरात जागा मंजूर केली आहे. सरपंच मीनाक्षी सावतकर व उपसरपंच गजानन देवसरकर यांच्या पाठपुराव्यामुळे या ठिकाणी मूलभूत सुविधांच्या विकासाचा आराखडा मंजूर झाला असून काही कामांना सुरुवातही झाली आहे. मात्र, बहुतांश कामे अद्याप अपूर्ण असल्याने पुनर्वसनाची प्रक्रिया रखडली असल्याचा आरोप नागरिकांनी केला.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सध्या वास्तव्यास असलेली जागा असुरक्षित बनली असून पूरस्थितीचा धोका कायम आहे. त्यामुळे महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे मोर्चेकऱ्यांनी सांगितले. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून पुनर्वसनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

मोर्चापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. त्यानंतर नागरिकांनी एसडीओ कार्यालयावर मोर्चा नेला. यावेळी प्रशासक मीनाक्षी सावतकर यांच्या हस्ते मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांना सादर करण्यात आले.

या मोर्चाचे नेतृत्व गजानन देवसरकर, प्रदीप राव देवसरकर, सचिन देवसरकर, वामनराव सावते, गजानन पाटील देवसरकर, तुळशीराम सावते, सुभाष सावते आणि अतुल देवसरकर यांनी केले.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पुनर्वसनाच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा निघावा, यासाठी पूरग्रस्तांनी एकजुटीने हा लढा उभारल्याचे नागरिकांनी सांगितले.

# 'लोकशाहीत मतभेद असावेत, पण शिष्टाचारही हवाच'

## नगराध्यक्ष कक्षातील वादानंतर प्रशासनाचे स्पष्टीकरण

प्रतिनिधी १८ जून

**यवतमाळ :** नगराध्यक्ष कक्षात ११ जून रोजी घडलेल्या वादाच्या घटनेनंतर विविध माध्यमे आणि सामाजिक माध्यमांवर सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ नगर परिषद प्रशासनाने अधिकृत भूमिका स्पष्ट केली आहे.

लोकशाही व्यवस्थेत मतभेद स्वाभाविक असले तरी ते संयमित, विधायक आणि संस्थात्मक मर्यादांचे भान राखून व्यक्त होणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

नगराध्यक्ष हे शहरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेणे, त्यांच्या निराकरणासाठी प्रशासनाशी समन्वय साधणे आणि लोकहिताचे निर्णय घेणे या उद्देशाने कार्यरत असतात.

नगराध्यक्षपद हे लोकशाही व्यवस्थेतील सन्माननीय पद असल्याने त्याच्या प्रतिष्ठेचे जतन करणे ही सर्व संबंधितांची सामूहिक जबाबदारी असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

नगर परिषदेत विविध राजकीय पक्षांचे लोकप्रतिनिधी नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करीत असतात. प्रशासन तसेच नगराध्यक्ष सर्व पक्ष, पदाधिकारी आणि नागरिकांकडून येणाऱ्या सूचना, अभिप्राय व विकासकामांबाबतच्या मागण्यांचे स्वागत करतात. मात्र, कोणत्याही विषयावरील चर्चा किंवा मतभेद व्यक्त करताना परस्पर सन्मान, शिष्टाचार आणि संस्थात्मक मर्यादांचे पालन आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

तसेच नगराध्यक्षांच्या दालनात अथवा नगर परिषदेच्या कार्यालयीन परिसरात कोणत्याही प्रकारचे व्हिडीओ चित्रीकरण, थेट प्रक्षेपण किंवा ध्वनिमुद्रण करण्यापूर्वी संबंधित प्राधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असल्याचेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. कार्यालयीन कामकाज, गोपनीयता आणि प्रशासकीय शिस्त लक्षात घेऊन या नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सामाजिक माध्यमांवर माहिती, छायाचित्रे किंवा व्हिडीओ प्रसारित करताना माहिती तंत्रज्ञान अधिनियमासह अन्य लागू कायदेशीर तरतुदींचे पालन करणे आवश्यक असून, अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करणे टाळावे, असेही प्रशासनाने म्हटले आहे.

शहराच्या विकासासाठी, नागरिकांच्या समस्यांच्या निराकरणासाठी आणि सर्व पक्षांच्या सहकार्याने सकारात्मक वातावरणात कामकाज सुरू ठेवण्यास प्रशासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट करत, एखाद्या एकाकी घटनेमुळे नगर परिषदेची अथवा नगराध्यक्षपदाची प्रतिमा मलीन होऊ नये, अशी भूमिका मुख्याधिकाऱ्यांनी मांडली आहे.

# बसचा टायर फुटला; वाहकासह दोघे जखमी

प्रतिनिधी १८ जून



**कळंब :** राळेगाव-जोडमोहा मार्गावरील बसचा देवनळा गावाजवळ टायर फुटल्याने अपघात झाला. या अपघातात बसचे वाहक राजू राठोड यांच्यासह दोन प्रवासी किरकोळ जखमी झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, जोडमोहा येथून राळेगावकडे येणारी बस देवनळा गावाजवळ पोहोचताच समोरील टायर फुटल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. परिणामी बस रस्त्याच्या कडेला असलेल्या नालीत जाऊन अडकली.

अपघातात वाहक राजू राठोड यांच्या डोक्याला व अंगाला दुखापत झाली असून त्यांच्यावर जोडमोहा येथील खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. अन्य दोन प्रवाशांनाही किरकोळ मार लागला. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली.

या घटनेनंतर प्रवासी व ग्रामस्थांनी राळेगाव आगाराकडून नादुरुस्त बस पाठविल्या जात असल्याचा आरोप करत सुरक्षित व दुरुस्त बससेवा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

# अमृत महोत्सवाला पर्यावरणाची जोड; माने परिवाराकडून २०१ वृक्षांचे दान

## वृक्षसंवर्धनाचा संदेश; कार्बन क्रेडिट बँकेकडे वृक्ष सुपूर्द

प्रतिनिधी १८ जून

**उमरखेड :** वाढते जागतिक तापमान आणि पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास लक्षात घेता वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन ही काळाची गरज बनली आहे. याच सामाजिक जाणीवेतून उमरखेड येथील शिवकमल मंगल कार्यालयात आयोजित विशेष सोहळ्यात माने परिवाराच्या वतीने 'भाऊसाहेब माने कार्बन क्रेडिट बँक व वृक्ष संवर्धन समिती'ला २०१ वृक्षांचे दान करण्यात आले. पर्यावरण रक्षणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

लोकनेते माजी आमदार स्वर्गीय भाऊसाहेब माने यांच्या सुनबाई इंदुमती पंजाबराव माने यांच्या ७७ व्या वाढदिवसानिमित्त, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती कल्याणराव भाऊसाहेब माने यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त तसेच कल्याणराव माने आणि कांताबाई माने यांच्या वैवाहिक जीवनाच्या ५० वर्षपूर्तीनिमित्त आयोजित अमृत महोत्सव व सुवर्ण सहजीवन सोहळ्याचे औचित्य साधून हा उपक्रम राबविण्यात आला.

कौटुंबिक आनंदाच्या क्षणाला सामाजिक बांधिलकीची जोड देत माने परिवाराने पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. ग्लोबल वॉर्मिंगला आळा घालण्यासाठी आणि परिसरात हिरवळ वाढविण्याच्या उद्देशाने २०१ वृक्षांचे दान करण्यात आले. हे वृक्ष




'भाऊसाहेब माने कार्बन क्रेडिट बँक व वृक्ष संवर्धन समिती, उमरखेड' यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले असून, स्वर्गीय पंजाबराव माने स्मृतिदिनानिमित्त दरवर्षी आयोजित वृक्षारोपण अभियानांतर्गत या वृक्षांची लागवड व संवर्धन केले जाणार असल्याची माहिती देण्यात आली.

या सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवर, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते तसेच नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> ■ "कुटुंबाची प्रगती ही अनेक पिढ्यांच्या कष्ट, त्याग आणि संस्कारांची देण असते. त्या ऋणाची जाणीव ठेवत परिवारातील ज्येष्ठांनी जगलेल्या प्रत्येक वर्षामागे एक वृक्ष लावून पृथ्वीला हिरवाईची भेट देणे, हीच आजच्या काळाची खरी गरज आहे."
> - डॉ. विजयराव माने, उमरखेड

माने परिवाराच्या पर्यावरणपूरक आणि आदर्शवत उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

# एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये; जिल्हा आरोग्य अधिका-यांचे आवाहन

## पल्स पोलिओ व स्टॉप डायरिया अभियानासाठी जिल्हास्तरीय नियोजन

प्रतिनिधी १८ जून

**यवतमाळ :** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या पल्स पोलिओ लसीकरण मोहीम व स्टॉप डायरिया अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय कार्यशाळा बुधवारी (दि. १७) जिल्हा परिषदेच्या वसंतराव नाईक सभागृहात पार पडली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यशाळेत जिल्ह्यातील आरोग्य अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना व मार्गदर्शन करण्यात आले.



कार्यशाळेत अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. क्रांतिकुमार नावंदीकर, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. प्रशांत घोडाम तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संघर्ष राठोड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी निवासी वैद्यकीय अधीक्षक डॉ. रमेश मांडण, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. तन्वीर शेख आणि जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. विशाल धांडे उपस्थित होते.

पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेची उद्दिष्टे, सूक्ष्म नियोजन, लसीकरणाची प्रभावी अंमलबजावणी, लाभार्थी बालकांपर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक उपाययोजना याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच स्टॉप डायरिया अभियानांतर्गत अतिसार प्रतिबंध, ओआरएस व झिंक गोळ्यांचे महत्त्व, जनजागृती आणि उपचार व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. सुभाष ढोले यांनी जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांनी पल्स पोलिओ मोहिमेदरम्यान एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही, यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आवाहन केले. तसेच स्टॉप डायरिया अभियान यशस्वी करण्यासाठी आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका आणि अंगणवाडी सेविकांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना दिल्या.

कार्यशाळेला जिल्ह्यातील सर्व वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यशाळेच्या माध्यमातून दोन्ही अभियानांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक नियोजन करण्यात आले.

# जवळा येथे महाराणा प्रताप जयंती साजरी

## शौर्य, त्याग आणि स्वाभिमानाचा आदर्श जपण्याचे आवाहन

प्रतिनिधी १८ जून

**आर्णी :** वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांची जयंती जवळा येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. देशभक्तीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला असून ज्येष्ठ नागरिकांसह युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाची सुरुवात जवळा येथील आठवडी बाजार परिसरात दुर्गा मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवर, ग्रामस्थ आणि युवकांनी महाराणा प्रताप यांच्या स्मारकासमोर पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



यावेळी झालेल्या मार्गदर्शनात वक्त्यांनी महाराणा प्रताप यांच्या शौर्य, त्याग आणि स्वाभिमानपूर्ण जीवनकार्याचा गौरव केला. हल्दीघाटीच्या युद्धात त्यांनी दाखविलेल्या पराक्रमाचा तसेच स्वराज्य आणि स्वाभिमानासाठी दिलेल्या संघर्षाचा आदर्श तरुण पिढीने घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गजानन सोळंके होते. यावेळी नंदकुमार चव्हाण, भारतसिंह बैस, गणेश मोरे, संजय खंदार, नंदू देशमुख, खेमसिंग राठोड, राजू खंदार, आनंदराव ढाकुलकर, अण्णाजी चोपडे, बाबाराव खोडणकर, विजय सोळंके, गणेश धनोडे, अबू मिस्त्री, महेश खंदार, आदित्य बैस, प्रशांत तायडे, आशिष खंदार, रमेश कोरटकर, अमोल ठाकरे, भगवंत खंदार, अनिल कोळेकर, रवींद्र धनोडे, गोपाल कोटमकार, सचिन धाये, बबन चोपडे, संजय नागापुरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशभक्तीपर घोषणांनी आणि महाराणा प्रताप यांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भारावून गेला होता.

सिटी न्यूज अमरावती
गुरुवार, दि.१८ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम २८ जून रोजी

**अमरावती:** भारताचा पोलिओमुक्त दर्जा कायम राखण्यासाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय लसीकरण दिन (NID) अंतर्गत रविवार, दिनांक २८ जून २०२६ रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब देण्यात येणार आहेत. भारताला २०१४ मध्ये पोलिओमुक्त घोषित करण्यात आले असले तरी जगातील काही देशांमध्ये पोलिओ विषाणूचे अस्तित्व असल्यामुळे सतर्कता बाळगणे आवश्यक आहे. अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शहरी आरोग्य केंद्रे, पोलिओ बूथ, तसेच विशेष पथकांमार्फत हे अभियान राबविण्यात येणार आहे. २८ जून रोजी बूथवर लसीकरण झाल्यानंतर आरोग्य कर्मचारी पुढील काही दिवस घरोघरी भेट देऊन राहिलेल्या बालकांना पोलिओचे डोस देणार आहेत. स्थलांतरित वस्ती, झोपडपट्ट्या तसेच उच्च जोखीम क्षेत्रांवर विशेष भर देण्यात येणार आहे.

# अमरावती स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक: मतदानासाठी जिल्हा प्रशासनाची तयारी पूर्ण

प्रतिनिधी १८ जून

**अमरावती:** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अमरावती स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या (महाराष्ट्र विधानपरिषदेची द्विवार्षिक निवडणूक) प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया उद्या, दिनांक १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत पार पडणार आहे. जिल्हा प्रशासनाने मतदानाची सर्व तयारी पूर्ण केली असून, आज सर्व मतदान पथके पोलीस बंदोबस्तात साहित्यासह केंद्रांवर रवाना झाली आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली आहे. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे आहेत. या निवडणुकीत शांततेत व सुरळीतपणे मतदान करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

या निवडणुकीत एकूण ३ उमेदवार रिंगणात असून, प्रत्यक्ष मतदान पसंतीक्रम पद्धतीने होणार आहे. यामध्ये मतदारांना उमेदवारांच्या संख्येइतके पसंतीक्रम देण्याची मुभा असेल. या मतदारसंघांत एकूण ४५१ मतदार असून, यामध्ये २२६ महिला व २२५ पुरुष मतदारांचा समावेश आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपंचायत आणि महानगरपालिकेचे सदस्य या निवडणुकीत मतदान करतात. मतदानाकरिता उपविभाग स्तरावर एकूण ७ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.

यामध्ये धारणी मतदान केंद्रावर ४२ मतदार (२० पुरुष, २२ स्त्री), अचलपूर केंद्रावर ६९ मतदार (३३ पुरुष, ३६ स्त्री), मोर्शी केंद्रावर ८१ मतदार (४३ पुरुष, ३८ स्त्री), दर्यापूर केंद्रावर ६० मतदार (३० पुरुष, ३० स्त्री), तिवसा-भातकुली केंद्रावर ३८ मतदार (१८ पुरुष, २० स्त्री), अमरावती केंद्रावर ९५ मतदार (४८ पुरुष, ४७ स्त्री) आणि चांदूर रेल्वे मतदान केंद्रावर ६६ मतदार (३३ पुरुष, ३३ स्त्री) आपले मत नोंदवतील. ही केंद्रे अनुक्रमे तहसील कार्यालय धारणी, उपविभागीय अधिकारी कार्यालय अचलपूर, तहसील कार्यालय मोर्शी, तहसील कार्यालय दर्यापूर, उपविभागीय अधिकारी तिवसा-भातकुली कार्यालय कॅम्प रोड अमरावती, ७/१२ संगणकीकरण कक्ष, अमरावती तहसील कार्यालय आणि तहसील कार्यालय, चांदूर रेल्वे येथे स्थापन करण्यात आली आहेत.

सातही मतदान केंद्रांवर प्रक्रिया पार पाडण्यासाठी केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, सूक्ष्म निरीक्षक व शिपाई असे एकूण ४२ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच पोलीस अधीक्षक व पोलीस आयुक्त यांच्या स्तरावरून चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. संबंधित उपविभागाचे उपविभागीय अधिकारी हे झोनल अधिकारी म्हणून कामकाज पाहत आहेत. आज सकाळी १० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथून सर्व पथके रवाना झाली. मतदानासाठी आयोगाचे मतदान कार्ड किंवा प्राधिकरणाने दिलेले ओळखपत्र ग्राह्य धरले जाईल. मतदारांची ओळख पटवण्यासाठी नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रात मुख्याधिकारी आणि महानगरपालिका क्षेत्रात मनपाचे सहाय्यक आयुक्त मतदान केंद्रावर उपस्थित राहतील. जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. तसेच केंद्राच्या आत मोबाईल व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे नेण्यास सक्त बंदी आहे. पावसाची शक्यता गृहीत धरून सर्व मतदान केंद्रांवर मतदारांसाठी विशेष छत्रीची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदानाचा दिवस हा कामकाजाचा दिवस असल्याने सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत केंद्र परिसर आणि १०० मीटरच्या बाहेर नागरिकांच्या सोयीसाठी संबंधित अधिकारी व कर्मचारी तैनात राहतील. उद्या, १८ जून रोजी मतदान प्रक्रिया आटोपल्यानंतर सर्व मतपेट्या चोख सुरक्षेत नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथील सुरक्षा कक्षामध्ये ठेवल्या जातील. त्यानंतर सोमवार, दिनांक २२ जून २०२६ रोजी नियोजन भवन येथेच मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.

## सराईत तडीपार आरोपीस ताब्यात घेवून त्याचे ताब्यातून देशी कट्टा व दोन जिवंत काडतूस जप्त

प्रतिनिधी १८ जून

**अमरावती :** सराईत तडीपार आरोपीस ताब्यात घेवून त्याचे ताब्यातून देशी कटटा व दोन जिवंत काडतूस जप्त करण्यास शहर गुन्हे शाखेला यश आले आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी अवैधरीत्या स्वता जवळ शस्त्र बाळगुण दहशत निर्माण करण्या-या इसमांवर प्रभावी कार्यवाही करण्याचे आदेश दिल्यावरून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर व पोलीस निरीक्षक दिनेश दाहातोडे यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही केली.

१६/०६/२०२६ रोजी गुन्हेशाखेने घातक शस्त्राबाबत विषेश मोहीम राबवली असता गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त माहीती मिळाली की, पो.स्टे. नागपुरी गेट येथुन तडीपार असलेला इसम नामे अहेसान खान हा स्वता जवळ देशी बनावटी कटटा (पिस्टल) बाळगुन पोस्टे फ्रेजरपुरा हददी मधील परिहारपुरा वडाळी पुला कडुन आशियाना क्लब कडे पायदळ येत आहे. अशा मिळालेल्या माहीतीवरून गुन्हे शाखेच्या पथकाने आशियाना क्लब जवळ जावून मोठ्या शिताफीने नमुद तडीपार इसमास ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कंबरेला एक देशी कटटा (पिस्टल) व दोन जिवंत काडतूस मिळुन आल्याणे ते जप्त करण्यात आले. नमुद आरोपीस सदर देशी कट्टा व दोन जिवंत काडतुस याबाबत विचारणा केली असता सांगीतले की रेहान खान अयुब खान उर्फ रेहान बंदुक रा. पाटीपुरा सुलतानच्या पानठेला जवळ अमरावती यांचे कडुन घेतले असल्याचे सांगीतले. नमूद तडीपार आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याचेवर यापुर्वी आयुक्तालयात गंभीर गुन्हे दाखल आहेत. तसेच नमुद तडीपार आरोपी यास अमरावती शहर व अमरावती ग्रामीण येथुन २ वर्षा करीता तडीपार करण्यात आले होते तरी सुध्दा कोणती ही वरिष्ठांची परवाणगी न घेता अग्णीशस्त्र स्वता जवळ बाळगुण मिळुण आल्याने नमूद दोन्ही आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा येथे कलम ३/२५ आर्म ॲक्ट सहकलम १४२, १३५ मपोका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव - अहेसान खान हसन खान वय २५ वर्ष रा. गुलीस्ता नगर अमरावती नाव आहे.

फरार आरोपीचे नाव

रेहान खान अयुब खान उर्फ रेहान बंदुक रा. पाटीपुरा सुलतानच्या पानठेला जवळ अमरावती असे आहे. जप्त करण्यात आलेला मुददेमाल एक नग देशी कटटा (पिस्टल) कि.अं. ३५,०००/- रू, २ दोनप नग जिवंत काडतूस (रांउड) कि.अं. २,०००/-रू, असा एकुण ३७,०००-०० रूपये मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## विद्यापीठात महाराणा प्रताप यांची जयंती साजरी



प्रतिनिधी १८ जून

**अमरावती:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात राष्ट्रगौरव, शूरवीर, महापराक्रमी महाराणा प्रताप यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, अधीक्षक डॉ. धनंजय पाटील तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व महाराणा प्रताप यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

## अट्टल गुन्हेगारांकडून ८ लाखांच्या २१ मोटरसायकली जप्त; १७ गुन्हे उघडकीस

प्रतिनिधी १८ जून

**अमरावती :** सिटी कोतवाली येथे मोटर सायकल चोरी करणा-या अटटल गुन्हेगारांकडून अदयापपावेतो एकूण ८ लक्ष किंमतीच्या २१ मोटर सायकली जप्त केले असून आयुक्तालयातील व इतरत्र पो स्टे अभिलेखावरील एकूण १७ गुन्हे उघडकीस आणले आहे.

पोलीस आयुक्तालय अमरावती शहर हददीत विशेषतः पोलीस स्टेशन सिटी कोतवाली हददीत मार्केट एरीया असल्याने मोटर सायकल चोरीचे प्रमाण जास्त आहे. तसेच यासंबंधाने मोटर सायकल चोरी बाबत पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथे चोरीचे गुन्हे दाखल आहेत. सदर मोटर सायकल चोरीच्या घटनांना प्रतिबंध करण्याचे संबंधाने तसेच यासंबंधीचे दाखल गुन्हे उघडकीस आणण्या संबंधाने



मा. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी विशेष आढावा घेवून यासंबंधाने करावयाच्या कार्यवाही व उपाययोजना बाबत योग्य त्या सुचना दिल्या होत्या. त्यानूसार पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथे विशेष पथक स्थापन करून मोटर सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरीता दाखल गुन्हयांचा तांत्रीक बाबीच्या आधारे तसेच गुप्तबातमीदाराकडून प्राप्त झालेल्या माहीतीच्या आधारे चिकाटीने सखोल तपास केला असता तपासदरम्यान खालील नमूद आरोपीतांनी याप्रमाणेचे गुन्हे पोलीस आयुक्तालय हददीत व इतरत्र ठिकाणी वारंवार केले असल्याचे निष्पन्न झाले. वरून तपासदरम्यान खालील नमूद आरोपीतांना ताब्यात घेवून त्यांचेकडून आजपावेतो एकूण ८ लाख रूपये किंमतीच्या एकूण २१ मोटर सायकली जप्त करण्यात आल्या आहेत. राहूल संतोष सोळंके, वय २४ वर्ष, रा. मरीमाता मंदीर जवळ, माळीपूरा, कारंजा लाड जि. वाशिम, लखन उत्तमराव चव्हाण, वय २६ वर्ष, महादेव उत्तमराव चव्हाण, वय २८ वर्ष, २ व ३ रा. अळनगाव ता. भातकुली जि. अमरावती वरील नमूद आरोपीतांकडून आजपावेतो एकूण २१ मोटर सायकली जप्त करण्यात आल्या असून जप्त सायकली बाबत खालील प्रमाणेचे गुन्हे दाखल आहेत.

: हिरो स्प्लेंन्डर प्लस मोटर सायकल. ४०,०००/- रू जप्त केला. आरोपीतांकडून अदयापपावेतो एकूण २१ मोटर सायकली जप्त करून अमरावती शहर आयुक्तालयातील एकूण ११ गुन्हे व इतरत्र ठिकाणावरील ०६ गुन्हे याप्रमाणे एकूण १७ गुन्हे उघडकीस आणले आहे. तसेच इतर जप्त ४ मोटर सायकली बाबत तपास सुरू आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला पोलीस उपायुक्त, परिमंडळ - २ श्याम घुगे, सहायक पोलीस आयुक्त, राजापेठ विभाग . संजय खताळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन सिटी कोतवालीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट, काईम पो. नि. रामदास पालवे यांचे नेतृत्वात डी. बी. पथक प्रमुख पो.उप.नि. तुषार गावंडे, पो.उप.नि रंगराव जाधव व डी. बी. अमलदार पोहेकॉ मंगेश भेलाये, हरिष बुंदले, नापोकॉ प्रदीप राठोड, प्रमोद हरणे, पोकॉ मंगेश दिघेकर, अथर अली, निलेश कांडलकर, आकाश इंगोले, बाबुसिंग राठोड तसेच ए.एस.आय. दिनेश मिश्रा, सुनिल विधाते, पोहेकॉ जिवन बांडे, नापोकॉ अतुल शिरभाते, पोकॉ संतीष कावळे, रामविजय गेडाम, मपोकॉ अश्विन बानुबाकोडे व चालक ए. एस.आय. दिनेश जवंजाळ, विश्वास गोंडाने, राजेश सदांशिवे, पोकॉ आनंद जाधव यांनी केली.

## जिल्हाधिकारी कार्यालयात महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन



प्रतिनिधी १८ जून

**अमरावती:** महान योद्धा मेवाडचे क्रांतीसूर्य राजे महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण अभिवादन केले. यावेळी उपस्थित अधिकारी-कर्मचारी यांनीही राजे महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

## तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या बैठकीतील निर्णयांची तीन वर्षांनंतरही अंमलबजावणी नाही

### 26 मे च्या परिपत्रकाविरोधात कोळी महादेव समाजाचे निवेदन

प्रतिनिधी १८ जून

**अमरावती :** कोळी महादेव जमातीच्या प्रलंबित मागण्या तसेच आदिवासी विकास विभागाने दि. २६ मे २०२६ रोजी जारी केलेले परिपत्रक रद्द करण्याच्या मागणीसाठी समाजाच्या वतीने आज अमरावती जिल्हाधिकाऱ्यांना दोन स्वतंत्र निवेदने सादर करण्यात आली.

समाजाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत समाजाच्या विविध मागण्यांबाबत सकारात्मक



निर्णय घेण्यात आले होते. मात्र, तीन वर्षांनंतरही त्या निर्णयांची अंमलबजावणी झालेली नसल्याने समाजात नाराजीचे वातावरण आहे.आदिवासी विकास विभागाच्या २६ मे २०२६ च्या परिपत्रकामुळे वैधता प्रमाणपत्र प्रक्रियेत विद्यार्थ्यांना, युवकांना व नागरिकांना अडचणी निर्माण होणार असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित परिपत्रक तात्काळ मागे घेऊन समाजहिताचे निर्णय घ्यावेत, अशी मागणी करण्यात आली.

कोळी महादेव समाजाच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अन्यथा राज्यव्यापी लोकशाही आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. निवेदनाद्वारे मुख्यमंत्री, आदिवासी विकास मंत्री व संबंधित विभागांकडे समाजाच्या मागण्या जिल्हाधिकारी अमरावती यांचे प्रतीनिधी अधीक्षक खटके यांचे मार्फत पोहोचविण्यात आल्या. यावेळी मोठ्या संख्येने कोळी महादेव अनुसूचित जमाती चे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## गजानन महाराज विजयग्रंथ व पादुका दर्शन सोहळ्याचे उद्या आ.रवी राणा यांच्या निवासस्थानी आयोजन

### ११ वर्षीय विजयग्रंथ वाचिका साक्षी सुनील ढगे हिच्या विजयग्रंथ पारायणाचा भक्तांना लाभ

प्रतिनिधी १८ जून

**अमरावती:** अमरावती शहरातील आ.रवि राणा व भाजपा नेत्या माजी खासदार नवनीत रवि राणा यांच्या शंकर नगर निवासस्थान परिसरात येत्या १९ जून २०२६ रोजी श्री संत गजानन महाराज विजयग्रंथ महापारायण व पादुका दर्शन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले असून या धार्मिक कार्यक्रमात मोठ्या संख्येने भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

जयपूर (मोताळा), जिल्हा बुलढाणा येथील देशमुख कुटुंबाच्या घरी श्री गजानन महाराजांनी प्रत्यक्ष वापरलेल्या पवित्र पादुकांचे दर्शन अमरावतीकर भक्तांना प्रथमच मिळणार आहे. या निमित्ताने ठश्री विजयग्रंथ महापारायण सोहळाठ आयोजित करण्यात आला असून दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे पुणे येथील अवघ्या ११ वर्षीय सुप्रसिद्ध विजयग्रंथ वाचिका कु. साक्षी सुनील ढगे हिच्या प्रमुख उपस्थितीत महापारायण संपन्न होणार आहे. त्यांच्या सुमधुर वाणीतून होणारे विजयग्रंथ पारायण भक्तांसाठी आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता महापारायणाने होणार असून दुपारी ३.३० वाजल्यापासून रात्री ८ वाजेपर्यंत भाविकांना पवित्र पादुकांचे दर्शन घेण्याची संधी उपलब्ध राहणार आहे. तसेच दर्शनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम आ.रवि राणा व भाजपा नेत्या माजी खासदार नवनीत रवि राणा यांच्या शंकर नगर येथील गंगा सावित्री निवास येथे आयोजित करण्यात आला असून अमरावती व परिसरातील सर्व गजानन भक्तांना उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी नाव नोंदणीची अंतिम तारीख १७ जून २०२६ ठेवण्यात आली असून भाविकांनी श्री विजयग्रंथ सोबत आणावा, व आपली नोंदणी सुनिल राणा मो.नं.९८२३६५१११२, श्री. प्रमोद कराळे मो.नं. ९४२३१२३१४५, श्री. उदय पर्वतकर मो.नं. ७९७२८५६०८७, श्री.अमोल गोमासे मो.नं. ९९७५१४९०३१, श्री.मनोज डहाके मो.नं.९३७०१०३९१३, श्री.नितीन बोरेकर मो.नं.८८३०२७७२१८, श्री.अविनाश काळे मो.नं. ९८३४२५८५०५ तसेच विरेंद्र उपाध्याय मो.नं.९५९५०६५३७३ यांच्याकडे नोंदवावी असेही आयोजकांनी कळविले आहे.

या धार्मिक सोहळ्याचे आयोजन श्री.गंगाधरराव राणा व सौ. सावित्री गंगाधरराव राणा यांनी केले असून कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अनेक सेवाभावी कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. या निमित्ताने अमरावतीत भक्तीमय वातावरण निर्माण होणार असून हजारो भाविकांच्या उपस्थितीची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## जिल्ह्यात कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वेय प्रतिबंधात्मक आदेश लागू

प्रतिनिधी १८ जून

**अमरावती:** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच शांतता व सुरक्षिततेचे वातावरण कायम ठेवण्याच्या उद्देशाने पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्याच्या ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. अप्पर जिल्हादंडाधिकारी श्री. संतोष काकडे यांनी याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

पोलीस अधीक्षक, अमरावती (ग्रामीण) यांनी सादर केलेल्या अहवालानुसार आगामी काळात विविध संवेदनशील प्रसंग, धार्मिक सण-उत्सव, निवडणूक प्रक्रियेशी संबंधित घडामोडी, विविध संघटनांची आंदोलने, मोर्चे, आरक्षणासंदर्भातील मागण्या तसेच सामाजिक व राजकीय कारणांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन खबरदारीचा उपाय म्हणून हे आदेश लागू करण्यात आले आहेत. या आदेशानुसार कलम ३७(१) अंतर्गत शस्त्रे, तलवारी, भाले, चाकू, लाठ्या किंवा जीवितहानी करू शकणाऱ्या वस्तू बाळगण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच विस्फोटके व त्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची वाहतूक, दगड, विटा अथवा इतर क्षेपणास्त्रे गोळा करणे किंवा त्यांचा वापर करणे, जमाव जमविणे, पुतळ्यांचे प्रदर्शन करणे तसेच जाहीररीत्या ओरडणे, गाणे, संगीत वाजविणे, अश्लील अथवा आक्षेपार्ह कृती करणे, बदनामीकारक वक्तव्ये करणे व अशा स्वरूपाच्या छायाचित्रांचे प्रदर्शन करणे यावरही निर्बंध घालण्यात आले आहेत.

कलम ३७ (३) अन्वये सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचे मानवी मेळावे व मिरवणुका आयोजित करण्यास बंदी राहणार आहे. दरम्यान, कर्तव्यावरील शासकीय व निमशासकीय कर्मचारी, लग्नसमारंभ, नाटक, तमाशे, धार्मिक विधी, शासकीय कार्यक्रम तसेच आठवडी बाजार यांना या आदेशातून सूट देण्यात आली आहे. अंत्ययात्रा वगळता इतर कोणत्याही मिरवणुकीसाठी किंवा रस्त्यावरून संचलनासाठी संबंधित पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांची पूर्वलिखित परवानगी घेणे आवश्यक राहील. या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील तरतुदीनुसार योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरुवार दि १८ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## उद्योजकांसाठी 'स्टँड अप इंडिया' मार्जिन मनी योजना लाभ घेण्याचे आवाहन

**वाशीम -** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मासाका-२०१८/प्र.क्र.२५९(२)/अजाक, दि. ८ मार्च २०१९ अन्वये केंद्र शासनाच्या 'स्टँड अप इंडिया' योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील लाभार्थ्यांसाठी मार्जिन मनी योजना सुरू करण्यात आली आहे.सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासन निर्णय क्रमांक स्टँडई-२०२०/प्र.क्र.२३/अजाक, दि. ९ डिसेंबर २०२० अन्वये निश्चित करण्यात आल्या आहेत. संबंधित शासन निर्णय शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून इच्छुक लाभार्थी त्याचे अवलोकन करू शकतात. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र व इच्छुक लाभार्थ्यांनी शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता करून आपले प्रस्ताव सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, वाशिम यांच्याकडे सादर करावेत.अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या योजनेचा लाभ घेऊन स्वयंरोजगार व उद्योजकतेकडे वाटचाल करावी, असे आवाहन पीयूष चव्हाण, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, वाशिम यांनी केले आहे.




# मतांचा बाजार, खासदारांचा व्यापार, सत्ताधाऱ्यांचा 'लोकशाही' वर प्रहार!

## *विकले जाणारे आणि विकत घेणारे दोघेही गद्दार *विचारात पडले मतदार

**●अतिश देशमुख @ वाशीम●**

काल (दि. १७) महाराष्ट्राच्या राजकारणात 'लोकशाही'ला काळिमा फसणारी आणखी एक घटना घडली. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे(UBT) ६ खासदार भाजपच्या मित्र पक्ष असलेल्या एकनाथ शिंदे च्या शिवसेनेत दाखल झाले. ज्या मतदारांनी 'भाजपा आणि शिंदे सेना नको' म्हणून उद्धव ठाकरेंना मत दिले, त्यांचा सर्वात मोठा विश्वासघात कालच्या घटनेने झाला आहे. फुटलेल्या खासदारांसाठी सोशल मिडियावर गद्दार, विकाऊ, फुटीर या शब्दांनी भरभराट झाली. पण हा फक्त पुढचा, दिसणारा भाग आहे. खरा मुद्दा पडद्यामागे आहे आणि तो आहे फोडाफोडीचे मास्टरमाईंड्स: संघ आणि भाजपचे वरिष्ठ नेते. हे प्रकरण केवळ ६ खासदारांचे नाही, हे लोकशाहीचा गळा घोटण्याचे व्यवस्थित, थंड डोक्याने रचलेले षड्यंत्र आहे.

**फोडाफोडीचा इतिहास आणि पद्धत:**

देशभरात गेल्या काही वर्षात भाजपने विविध राज्यांमध्ये स्थानिक पक्ष फोडण्याचे, आमदार-खासदार खरेदी करण्याचे सिलसिले चालवले आहेत. वाशिममध्ये मागील ८-१० दिवसापूर्वी शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाचे वाशिम जिल्हाप्रमुखांनी भाजपशी घरोबा केला आणि याआधी ब्रँड खासदार राहिलेल्या 'ताईंनी' शिंदेसेनेत आसरा घेतल्याच्या घटना घडल्या. आणि आता कालच्या ६ खासदारांनी मतदारांना 'जोर का झटका' दिला आहे.

यासाठी ईडी, सीबीआय, न्यायालय, प्रसार माध्यमे आणि पैसा या सर्व हत्यारांचा वापर झाला.

शरद पवार गटातील रोहित पवार यांनी स्पष्ट सांगितले: 'एकेका खासदाराचा रेट ८५ कोटी...' सत्ताधाऱ्यांकडे एवढे पैसे कुठून येतात? शिवसेना, राष्ट्रवादी, तृणमूल काँग्रेस, आप या सर्व पक्षांवर हल्ला चालू आहे. सर्वांचे आमदार आणि खासदार पळवणे सुरु आहे. २०२२ च्या शिवसेना फोडफोडीवेळी प्रत्येक फुटीर आमदाराला ५० कोटी रुपये दिल्याची चर्चा सोशल मीडियावर व्हायरल झाली होती. '५० खोके- एकदम ओके' नारा किती दिवस लोकांच्या ओठांवर होता. आता खासदारांच्या बाबतीत आकडे आणखी वाढले असल्याचे बोलले जात आहे. मागे राज्यसभेत पुरेसे बहुमत नसल्याने भाजपला हवे ते कायदे मंजूर करता आले नव्हते. त्यामुळे साम, दाम, दंड नीतीचा वापर करून एका पाठोपाठ एक खासदार टिपले जात आहेत. लोकांचे मत खरेदी करता नाही आले तेव्हा लोकप्रतिनिधींचे खरेदी करण्याचा अत्यंत किळसवाना प्रयोग केला जात आहे. काल उद्धव सेनेच्या गटाचे ६ खासदार गेले, उद्या आणखी जातील. कसेही करून त्यांना ३६० खासदारांचा आकडा गाठायचा आहे. म्हणून हा सिलसिला थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत.

**लोकशाहीची क्रूर हत्या:**

मतदारांना निवडणुकीच्या वेळी सांगितले जाते, 'तुमचे मत अमूल्य आहे, ते विकू नका.' पण जेव्हा निवडून आलेला लोकप्रतिनिधी स्वतःच विरोधी पक्षाला विकला जातो, तेव्हा काय म्हणायचे? हे केवळ फुटीरतेचे राजकारण नाही. ही लोकशाहीची हत्या आहे. जाणकार म्हणतात, 'ऑपरेशन टायगर' च्या नावाखाली ही लोकशाहीची हत्या आहे. ज्यां मतदारांनी 'आपले प्रतिनिधी' निवडले, ते प्रतिनिधी आता सत्तेच्या आणि पैशाच्या लालसेने आणि दबावापुढे झुकून दुसऱ्या बाजूला जात असल्याबद्दल मतदारांमध्ये तीव्र संतापाची लाट आली आहे. त्यांचा हा राग साहजिकच आहे. पण फक्त फुटीर आमदार-खासदारांवर राग काढून चालणार नाही. खरे दोषी कोण आहेत? जे संविधानिक संस्थांवर ताबा मिळवून निरंकुश सत्तेच्या लालसेपोटी हे सगळे घडवून आणत आहेत...? ED-CBI चा दुरुपयोग, निवडणूक आयोग आणि न्यायालयीन प्रक्रियेचा राजकीय वापर, माध्यमांमधील प्रचार, आणि अफाट पैशाचा स्रोत यावर कोण बोलणार?

**मतदारांवर विचार करण्याची वेळ:**

जनता फुटीर नेत्यांना माफ करणार नाही, हे खरे. पण जे पैसा आणि सत्तेच्या जोरावर संपूर्ण लोकशाही यंत्रणेचा गळा घोटत आहेत, त्यांच्याबद्दल काय बोलावे?एका बाजूला 'लोकशाहीचे रक्षण' चा नारा आणि दुसऱ्या बाजूला लोकशाही संस्थांचाच गैरवापर करून विरोधकांना राजरोसपणे फोडायचे...ही दुटप्पी नीती किती दिवस चालणार? महाराष्ट्रात आणि देशात जनतेने याचा गंभीर विचार करायला हवा. कारण आज उद्धव ठाकरे गट, उद्या दुसरा पक्ष, परवा आणखी एक. शेवटी उरेल फक्त एकच पक्ष आणि एकच आवाज. तेव्हा 'लोकशाही' हा शब्द फक्त पुस्तकात राहील.

फोडाफोडी करणारे आणि करवणारे दोघेही लोकशाहीचे विरोधी आहेत. एक विकतो, दुसरा विकल्या जातो. पण शेवटी तोटा कोणाचा होतो?...सामान्य मतदाराचा. ज्याने विश्वासाने मत दिले, त्याचा.

आता जनतेला ठरवायचे आहे, हे सहन करायचे की नाही. अन्यथा भविष्यातील परिणाम सर्वांनाच भोगावे लागतील. लोकशाही वाचवायची असेल तर फक्त फुटीरांना शिव्या देऊन चालणार नाही. मूळ षड्यंत्रकर्त्यांवर प्रहार करायला हवा.

जनतेची जागृती हीच एकमेव आशा आहे.

**- मो.९४०४८३३५७७**

# फिल्मीदुनियेचीसफर, अमीर खानचे नियोजन आणि अविस्मरणीय सहल!

**●सिटी न्युज ब्युरो @ वाशिम●**

सोमवार दि. १३, १४ जून २०२६ रोजीचा अनुभव १५ सप्टेंबर २०२५ नंतर तब्बल ९ महिन्यांनी प्रवासातील अनुभव लिहितोय...

अविरतपणे प्रवास वर्णन वाचणाऱ्या वाचकांचा मी खऱ्या अर्थाने गुन्हेगारचं.

केवळ 'कंटाळा' हे एकमेव कारण सोडले तर प्रवास वर्णन न लिहिण्याचे दुसरे कोणतेही कारण नाही.

या नऊ महिन्याच्या कालावधीत कित्येक वाचकांनी शब्दशः व व्यक्तिशः खंत व्यक्त केली की, आपण प्रवास वर्णन का लिहीत नाही. आम्ही आपले प्रवास वर्णन वाचण्यास आतुर असतो. वाचकांच्या या प्रश्नावर मला निरुत्तर होण्याशिवाय पर्याय नसतो. मात्र आता पुन्हा सर्व वाचकांची दिलगिरी व्यक्त करून इथून पुढे खंड पडणार नाही, याची ग्वाही देत प्रवासातील अनुभवाचा २७ वा भाग आपल्यासमोर ठेवत आहे. माझ्या काही पत्रकार मित्रांची आणि माझी , कुठेतरी सहकुटुंब फिरायला जाऊ, याबाबत खालबते सुरू होती. मागील सहा महिन्यापासून ठिकाण ठरविणे आणि प्लानिंग करणे यातच वेळ जात होता. घरच्या गृहमंत्र्यांनाही सांगून ठेवले होते, की लवकरच आपल्याला सहकुटुंब सहलीला जायचे आहे. आता काही दिवसांवर पावसाळा येत असल्यामुळे पुन्हा चार महिने सहलीला ब्रेक लागणार होता. हा ब्रेक लागण्यापूर्वी आपण जर सहलीला गेलो नाही तर, 'गृहमंत्री' नाराज होतील आणि त्यांचा रोष ओढवून घेणे परवडणार नाहा. म्हणून घाईघाईने नियोजन केले. आणि सर्वांनुमते, ङहैद्राबाद टूरङ ठरला. हैदराबाद जायचं म्हणजे , फार काही कठीण नव्हतं. कारण आपल्या वाशीम वरून दररोज काचीगुडा ही रेल्वे गाडी हैदराबादला जाते. मग काय, गेलो रेल्वे स्टेशनवर अन, चार फॅमिलींची येण्याची आणि जाण्याची तिकिटे बुक केली. आमचे पत्रकार मित्र, अतिश देशमुख , देव इंगोले, आर जे इरफान सय्यद आणि मी गजानन धामणे असे आम्ही चौघे जण सहकुटुंब सहलीला निघालो. हैदराबाद येथे असणारी ङरामोजी फिल्मसिटीङ आणि हैदराबाद शहरातील महत्त्वाची ठिकाणे पाहण्याचा बेत करून आम्ही मार्गस्थ झालो. दि. १२ जून २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजता काचीगुडा एक्सप्रेस ने वाशिम वरून मार्गस्थ झालो. कुठलाही टूर करायचा म्हणजे नियोजन आलेच, तिथे गेल्यानंतर कशाने फिरायचे, कुठे कुठे फिरायचे, किती दिवस फिरायचे आणि राहायचे कसे, याबाबतचे नियोजन ओघाने आलेच. हे नियोजन आम्हीही केलं. या नियोजनासाठी आम्हाला यापूर्वी हैदराबादला जाऊन आलेले आमचे मित्र राम शृंगारे यांनी त्यांचा टूर उत्तम प्रकारे ज्यांनी घडवून आणला . त्या व्यक्तीचे नाव आणि नंबर आम्हाला दिला. त्या व्यक्तीचे नाव होते, 'अमीर खान' आपण आश्चर्यचकित झाला असाल, आमिर खान तर प्रसिद्ध चित्रपट अभिनेते. ते कसे काय यांचा टूर घडवून आणतील. आपल्याला पडलेला प्रश्न अगदी बरोबर आहे. परंतु, हैदराबादचे हे अमीर खान, चित्रपट अभिनेते नसून, हैदराबाद मध्ये येणाऱ्या पर्यटकांना, प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देत गाईड करणारे एक सामान्य ऑटो चालक आहेत. मात्र, हे अमीर खान सामान्य ऑटोचालकांपेक्षा काहीतरी वेगळेच आहेत त्यांच्याकडे हैदराबाद शहराची खडानखडा माहिती आहे. मागील शेकडो वर्षांचा इतिहास ते सहजतेने सांगतात. कोणते ठिकाण पाहिले पाहिजे. कोणत्या ठिकाणी काय विशेष आहे. त्याचा इतिहास काय, रामोजी फिल्मसिटी चा संपूर्ण इतिहास, या सगळ्या बाबी आमिर खान यांना तोंडपाठ आहेत. दि. १२ जून रोजी रात्री साडेनऊ वाजता आम्ही काचीगुडा येथे पोहोचलो. आधीच संपर्क केलेला असल्यामुळे आमिर खान आणि त्यांचे दुसरे सहकारी आम्हाला स्टेशनवर घेण्यासाठी आले. त्यांच्या ऑटो मध्ये बसून आम्ही हॉटेलवर मुक्कामासाठी गेलो. तेथे रात्रभर निवांत झोप झाली. दि. १३ जून रोजी सकाळी ठीक साडेसात वाजता सर्व तयारी करुन हॉटेलच्या प्रवेशद्वारावर येताच, आमिर खान आणि त्यांचे सहकारी आपले ऑटो घेऊन रेडी होते, साब आपने जो टाईम दिया उस टाइम पे परफेक्ट आ गये, खरंतर रेडी होण्याचा टाईम त्यांनीच आम्हाला दिला होता. अधिक वेळ न घेता आम्ही पटापट दोन दोन फॅमिली दोन ऑटो मध्ये बसलो. ३० किलोमीटरचा प्रवास करून आम्हाला 'रामोजी फिल्मसिटी' मध्ये जायचे होते. रामोजी फिल्म सिटी मध्ये कोणत्या ठिकाणी किती वेळ द्यायचा, कोणते ठिकाण बघायचे, याबाबतची सर्व इत्यंभूत माहिती आम्हाला आमिर खान यांनी आधीच दिली होती रामोजी फिल्मसिटी येण्याच्या अगोदरच त्यांनी एका चांगली हॉटेल असलेल्या ठिकाणी ऑटो थांबविला आणि पोटभर नाश्ता करून घेण्याचे सांगितले. आम्हीही पटापट नाश्ता करून घेतला आणि रामोजी फिल्मसिटी मध्ये प्रवेश केला.तेथेही आमिर खान यांनी नियोजन करून तिकीट लाईन मध्ये न लागता क्षणात आम्हाला ऑनलाईन तिकीट मिळवून दिले. यानंतर रामोजी फिल्म सिटी मध्ये जाणाऱ्या पहिल्या बसमध्ये आम्ही आत शिरलो. जसजसे आत जात होतो, तसतसे डोळ्यांचे पारणे फेडणारे चित्र आम्हाला दिसत होते. यावेळी एका आमदाराचे वाक्य होते, ' काय ती झाडी, काय ते डोंगर' ह्या वाक्याची आम्हाला आठवण आली. काही अंतर गेल्यानंतर बस नियोजित ठिकाणी पोहोचली. त्या ठिकाणचे दृश्य पाहिल्यानंतर रामोजी फिल्मसिटी ची भव्य दिव्यता किती मोठी आहे याची कल्पना आली होती. रामोजी फिल्म सिटी बद्दल सांगायचे झाले तर, दाक्षिणात्य निर्माते रामोजी राव यांनी १९९१ साली रामोजी फिल्म सिटी च्या उभारणीची सुरुवात केली. आणि १९९६ साली ठराविक काम पूर्ण झाल्यावर येथे चित्रपटाचे शूटिंग सुरू झाले. तब्बल २००० एकर विस्तीर्ण परिसरात ही फिल्म सिटी पसरलेली आहे. नैसर्गिक डोंगर, त्या डोंगरावर असलेले अवाढव्य दगड, आणि एकूणच प्रसन्न अशा भूमीत ही फिल्म सिटी वसलेली आहे. या फिल्म सिटी मध्ये ७७०० कर्मचारी कार्यरत आहेत. आज पर्यंत या ठिकाणी ३३०० चित्रपटांची शूटिंग झाली आहे.आपण बालपणापासून पाहत आलेले अनेक चित्रपट या ठिकाणी शूट झाले आहेत. त्या चित्रपटांमध्ये दाखविलेले बंगले, गाणे शूट झालेले गार्डन्स, बाजारपेठा, कारागृह, रेल्वे स्टेशन, गाव खेड्याचे चित्र, रामायण महाभारताच्या सिरीयल मधील सेट, बाहुबली चित्रपटाचा संपूर्ण सेट आजही तेथे कार्यरत आहेत. फिल्म सिटी मध्ये प्रवेश करताना, एखाद्या राजवाड्याप्रमाणे असणारे भले मोठे दोन दरवाजे उघडले जातात. त्यानंतर त्या ठिकाणी तेथील डान्स करणारे कलावंत सुंदर डान्स करून फिल्म सिटी मध्ये आलेल्यांचे स्वागत करतात. खरं म्हणजे हा क्षण अगदी डोळ्यांचे पारणे फेडणारा असतो. पाच ते दहा मिनिटांचा डान्स शो झाल्यानंतर गेटमधून आत एन्ट्री होते. जवळपास ५०० लोकांचा समूह आज प्रवेश करतो. आत प्रवेश केल्यानंतर पुन्हा नृत्य सुरू होते. तिथून उजवीकडे गेल्यानंतर चित्रपटात जशी मारामारी ची शूटिंग असते तशीच हुबेहूब मारामारीची कलाकृती तेथील सिने कलावंत सादर करतात.मग तेथून सुरू होतो. विविध सेट पाहण्याचा प्रवास. एक सेट पाहिला की बाहेर यायचे, तेथे पुढील सेटवर जाण्यासाठी ट्रॅव्हल लागलेलीच असते. असे करत एक एक सेट आम्ही पाहत गेलो. काही ठिकाणी फोटो आणि सेल्फी घेतल्या. सेटमध्ये रामायण महाभारताचा सेट, मोठमोठ्या बंगले असणाऱ्या इमारतींचे सेट, चित्रपटात दाखविले जाणारे कारागृह, खेडेगाव, रेल्वे स्टेशन, विमानतळ, काही विशिष्ट बंगले, जसे की सूर्यवंशी चित्रपटात अमिताभ बच्चन यांचा दाखविलेला बंगला. असे अनेक सेट पाहून डोळ्यांचे पारणे फिटते. येथे मनाला भावलेली एक बाब म्हणजे, चित्रपटाची शूटिंग कशी होते आणि आपण तो चित्रपट पडद्यावर कसा दाखविला जातो याचे प्रात्यक्षिक तेथे दाखविले जाते. प्रेक्षकांमधूनच काही प्रेक्षक स्टेजवर जातात, त्यांची शूटिंग होते आणि पुढे एखादा सीन कसा दाखविला जातो याचे हुबेहूब चित्रण तेथे बघायला मिळाले. शूटिंग आणि चित्रपटात दाखविले जाणारे दृश्य, हे बघितले तर खरं म्हणजे चित्रपटावरचा विश्वास ऊडून जातो . मात्र हे सुद्धा येथे प्रामुख्याने सांगितले जाते हेच या फिल्म सिटी चे विशेष होय. या ठिकाणी जापानीज गार्डन, अमेरिकन गार्डन असे कितीतरी प्रकारचे एकशे बढकर एक गार्डन आहेत. मी तरी आजपर्यंत आयुष्यात कधीही एवढे सुंदर गार्डन बघितले नाहीत. येथे विविध पक्ष्यांचे कप्पे आहेत, फुलपाखरांचे गार्डन आहे. वरतून कोसळणारा कृत्रिम परंतु हुबेहूब वाटणारा धबधबा. हुबेहूब साकारलेली बुद्ध लेणी, एका उंच टेकडीवर नृत्यगृहामध्ये नृत्य करत असलेली नृतिका, सगळं काही अप्रतिमच. या फिल्मसिटी बद्दल डिटेल्स लिहायचं म्हटल्यावर खूप मोठ होईल. एका ठोक्यात वाचणे ही आपणाला शक्य होणार नाही. त्यामुळे, ही फिल्म सिटी म्हणजे अप्रतिमच, आपण प्रत्येकाने येथे एकदा तरी भेट दिली पाहिजे. एवढेच मी सांगेल. सायंकाळी सात वाजता आम्ही फिल्म सिटी मधून बाहेर पडलो. दिवसभर डोळ्यांचे पारणे फेडणारे चित्र पाहिल्यामुळे भुकेची आम्हाला आठवण आली नाही. फिल्म सिटीतून बाहेर पडल्यावर मात्र, कडाक्याची भूक लागली. बाहेर आल्यानंतर आमिर खान आणि त्यांचे सहकारी आपले ऑटो घेऊन रेडी होते. पटापट ऑटोत बसलो आणि हैदराबाद कडे रूमच्या दिशेने निघालो. इकडे गावात आल्यानंतर छान अशा हॉटेलमध्ये जेवण केले. आणि नंतर हॉटेल जवळ केले. आता संपूर्ण हैदराबाद पाहण्यासाठी आमच्याकडे केवळ एक दिवस होता. मात्र आमिर खान यांनी , साब आप सुबह ७ बजे रेडी रहना, हम बराबर टाइम पर पोचते है. एवढे सांगून आपल्या घराकडे गेले. एका दिवसात जवळपास महत्त्वाचे पॉईंट कव्हर करून देतो, फक्त आपण फोटो काढण्यात, सेल्फी काढण्यात वेळ घालू नका आणि पटापट पुढे चालत रहा अशा सूचना आधीच केल्या होत्या. ठरल्याप्रमाणे आमिर खान आणि त्यांचे सहकारी सकाळी सात वाजता हॉटेल समोर आले, आम्हीही ठराविक वेळेत तयार झालो. ऑटोत बसलो आणि प्रवास सुरू झाला. पहिल्यांदा ऑटो थांबला तो 'चारमिनार' येथे. आमिर खान यांनी चारमिनार चा इतिहास आम्हाला सांगितला, तेथेच जवळ असणारी भली मोठी चारशे वर्षे जुनी असणारी मज्जिद दाखविली. तेथून आम्ही ङसालारजंगङ म्युझियम मध्ये गेलो. या म्युझियम मध्ये अनेक दुर्मिळ आणि ऐतिहासिक साहित्य आम्हाला बघायला मिळाले. एक तासानंतर तेथून बाहेर आलो, तेथून ङनेहरू प्राणी संग्रहालयातङ गेलो. हे प्राणी संग्रहालय म्हणजे, कित्येक एकर परिसरात असलेले विस्तीर्ण जंगल. या प्राणी संग्रहालयात विविध प्रजातींचे प्राणी बघितले. सोबत असणारी आमची मुले वाघ, सिंह, हत्ती, पाहून जाम खुश झाले. दोन तासानंतर तेथून बाहेर पडलो. तेथून थेट ङगोळकोंडाङ किल्ल्याकडे. गोळकोंडा किल्ल्याला सुद्धा शेकडो वर्षांचा इतिहास आहे. आजही या किल्ल्यावर हजारो पर्यटक दररोज येतात. वेळेच्या अभावामुळे आम्हाला किल्ल्यावर पोहोचणे शक्य नव्हते. किल्ल्याच्या पायथ्याशीच एक स्टुडिओ होता, तेथे गोळकोंडा किल्ला आणि संपूर्ण हैदराबाद ची इत्यंभूत माहिती, फिल्म मधून दाखविली जात होती. आम्ही तिथे जाऊन तिकीट काढले आणि एक तासाचा शो बघितला. या शोमध्ये हैदराबाद शहराचा हजारो वर्षांचा इतिहास दाखविला गेला. येथे असणारे निजामाचे राज्य, त्यापूर्वीच्या अनेक राज्यांचे राज्य आणि त्यानंतरची स्थित्यंतरे दाखविली गेली. यातून एक प्रकार्षाने जाणवले की, आम्ही फार बोटावर मोजण्या इतकेच प्रमुख ठिकाणे पाहिली. मात्र, येथे शेकडो पॅलेस असे आहेत की, जे आजही शाबूत आहेत आणि हैदराबादच्या जाज्वल्य इतिहासाची साक्ष देतात. पुढे जेव्हा केव्हा हैदराबादला येणे होईल त्यावेळेस, येथील पॅलेस, विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची भव्य मूर्ती, हुसेन सागर तलाव, असे विविध ठिकाणे आरामात बघूयात हा विचार करून आम्ही तेथून निघालो. हैदराबाद मध्ये काही वर्षांपूर्वी दुबई शहरालाही लाजवेल अशी भव्य ङस्मार्ट सिटीङ तयार झाली आहे. मोठमोठ्या उंच काचाच्या इमारती, त्यामध्ये असणारी विविध कॉर्पोरेट ऑफिसेस, मॉल, सगळं काही दुबई प्रमाणे आहे. आमच्या अमीर भाईंनी अधिक वेळ न घेता आपले ऑटो सरळ स्मार्ट सिटी कडे वळवले. आम्ही थेट एका भल्या मोठ्या मॉलवर येऊन थांबलो. कितीतरी मोठ्या विस्तीर्ण जागेत असणारे हे मॉल पाहून आम्हाला नक्कीच दुबईत असल्याची जाणीव होत होती. या मॉलमध्ये पाचव्या मजल्यावर काश्मीर प्रमाणेच कृत्रिम बर्फाचे काश्मीर बनविले आहे. सगळ्यांची इच्छा झाली आणि प्रत्येकी तब्बल आठशे रुपयांचे तिकीट काढून आम्ही आत शिरलो. काश्मीरमध्ये घातले जाणाऱ्या टोपी स्वेटर बूट, सगळं काही आम्हाला देण्यात आलं. आत गेल्यानंतर जणू काही आपण काश्मीर मध्येच आहोत अशी प्रचिती आली. मुलांसह आम्ही सुद्धा खूप एन्जॉय केलं. बर्फाची उधळण केली. उड्या मारल्या. जणू काही काश्मीरचीच सहल करून आल्याचा भास आम्हाला झाला. तेथून बाहेर पडल्यानंतर पटापट ऑटोमध्ये बसून स्मार्ट सिटी कडे निघालो. सहा पदरी रस्त्यावरून मार्गक्रमण करताना रस्त्याच्या दोन्ही कडेला उंच उंच इमारती दिसत होत्या. जणू काही आपण दुबई शहरात फिरतोय , असे भासत होते. ऑटो जस जसा पुढे जात होता तस तशी आमिर खान आम्हाला माहिती देत होते. कोणत्या बिल्डिंगमध्ये काय आहे. विशेषता या ठिकाणी चित्रपट अभिनेत्यांचे अनेक बंगले आहेत. त्यांचे काही हॉटेल्स व इतर उद्योग आहेत. त्याबद्दलही आमिर खान यांनी आम्हाला माहिती दिली. पुढे आल्यानंतर पुष्पा चित्रपटाचे नायक अल्लू अर्जुन यांचे घर आम्हाला दाखविले. तेथे आम्ही सेल्फी घेतले. आता सायंकाळचे साडेसात वाजले होते. भूक सुद्धा लागली होती आणि परतीच्या प्रवासाची तयारी करावी लागणार होती. त्यामुळे आम्ही जेवणाच्या हॉटेलकडे निघालो. या प्रवासात ऑटो चालक आमिर खान यांनी, एक मदतकार्य राबविले, ते पाहून आमिर खान यांच्या औदार्याबद्दल आमचा उर भरून आला.






## प्रवास वर्णन

झाले असे की, एक नवीन ऑटोवाला, जो नव्यानेच हैदराबाद येथे येऊन ऑटो चा व्यवसाय करण्याची सुरुवात केली होती. अशा ऑटो चालकाचा ऑटो चा गॅस संपल्यामुळे तो आपला ऑटो लोटत होता. तेथून चार-पाच किलोमीटर परिसरात कुठेही गॅस पंप नव्हता. आमिर खान यांच्या लक्षात ही बाब आल्यानंतर त्यांनी, आपला ऑटो चालवत असताना एका पायाने तो ऑटो पुढे ढकलला सुरुवात केली. दरम्यान आमच्या ऑटोतील एक जणाला त्या ऑटोत बसविले. आणि एका पायाने तो ऑटो ढकलत पुढे नेला. तब्बल पाच किलोमीटर पर्यंत तो ऑटो पुढे ढकलण्याचे काम आमिर खान यांनी केले. शेवटी तो ऑटो चालक आणि आमचा मार्ग वेगळा होणार असल्यामुळे आम्ही आमच्या मार्गाने पुढे निघालो. यावेळी तो ऑटो चालक अत्यंत विनयशीलतेने कृतघ्न होत, आमिर खान यांना अक्षरशः दंडवत घातले. आणि आभार व्यक्त केले. वास्तविक पाहता त्या ऑटो वाल्याला मदत करा असे आम्ही कोणीही आमिर खान यांना सांगितले नाही, आमिर खान यांनी स्वतःच त्यांना मदत करण्याचे ठरविले आणि त्यांचा ऑटो पुढे नेण्यास सहकार्य केले. अमीर खान यांच्या या कार्यामुळे त्यांचा मला सार्थ अभिमान वाटला. पुढे काही क्षणात हॉटेल आले आणि आम्ही येथेच हैदराबादी जेवण केले. तेथून हॉटेल कडे गेलो आणि चेक आउट करून काचीकूडा रेल्वे स्टेशन कडे रवाना झालो. स्टेशनच्या प्लॅटफॉर्म पर्यंत, आमिर खान व त्यांच्या सहकाऱ्यांनी आम्हाला आणून सोडले. यावेळी ठरलेल्या पेक्षा थोडे अधिक पैसे देऊन आम्ही अमीर खान यांचा निरोप घेतला. निघताना आवर्जून सेल्फी घेतला आणि जल्द ही मिलेंगे, असे म्हणत प्लॅटफॉर्मवर आलो. पुढे ठराविक वेळेच्या काही तासानंतर रेल्वे आली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही स्वगृही वाशिमला पोहोचलो. आज पर्यंत मी अनेक टूर केले. परंतु हैदराबादचा हा टूर खरोखरच अविस्मरणीय ठरला. तो म्हणजे आमिर खान यांच्यामुळे. मागील काही वर्षांपासुन काही फॅसिस्ट संघटनाकडून मताच्या ध्रुवीकरणासाठी समाजात 'हिंदू- मुस्लिम' द्वेषाचे राजकारण केले जाते. मात्र प्रत्यक्ष व्यवहारात जेव्हा केव्हा एखाद्या मुस्लिम व्यक्तीशी संबंध येतो, तेव्हा तसा विरोधाभास कुठे दिसून येत नाही. जीवाला जीव देणारी माणसं बघायला मिळतात. अडचणीच्या वेळी मदत करणारी माणसे मिळतात. तेथे धर्माला कुठेच थारा नसतो.खरंतर आमिर खान सुद्धा इतर ऑटो प्रमाणे ट्रिक करून एक व्यावसायिक म्हणून आमची ने आण केली असती परंतु, आमचा टूर यशस्वी व्हावा, सर्व काही बघायला मिळावे, यासाठी आमिर खान यांनी केलेली धावपळ, काही केले तरी विसरू शकणार नाही. एवढे मात्र नक्की! आपल्याला सुद्धा ङहैद्राबाद टूरङ करायचा असेल तर केव्हाही ङअमीर खानङ यांना कॉल करा. ते आपल्याला स्टेशनवर घ्यायला येतील. संपूर्ण टूर योग्य नियोजनात आणि कमी वेळेत करून देतील, याची मला ग्वाही आहे. संपर्कासाठी : अमीर खान, हैद्राबाद ( ऑटोचालक ) मो. ९९५९६३४५९९

( **टिप :** मी दैनंदिन कामानिमित्त दररोज कुठेतरी प्रवास करत असतो. प्रवासादरम्यान अनेक अनुभव मला येत असतात. यातील काही निवडक अनुभव शेअर करण्यासाठी मी ङप्रवासातील अनुभवङ हे सदर सोशल मीडियावर सुरू केले आहे . आजचा हा ङसत्तावीसङ वा भाग आहे. हा अनुभव आपणास कसा वाटला हे आपल्या कमेंट च्या माध्यमातून जरूर कळवा. )

**- गजानन धामणे**
**मुक्त पत्रकार, वाशिम**
**९८८१२०४५३८**

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
गुरुवार, दि. १८ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## नाट्यकर्मी गणेश राणे यांना शासनाचा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार

**बुलढाणा :** येथील महावितरणचे कर्मचारी तथा प्रसिद्ध नाट्यकर्मी गणेश राणे यांना महाराष्ट्र शासनाच्या कामगार कल्याण मंडळाच्यावतीने दिला जाणारा सन २०२४ चा विश्वकर्मा गुणवंत पुरस्कार पुरस्कार जाहीर झाला आहे. रोख २५ हजार रुपये, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. राज्य शासनाच्या कामगार कल्याण मंडळाच्यावतीने साहित्य, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात कार्य करणाऱ्या कामगारांना विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. सन २०२४ च्या विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कारासाठी बुलढाणा महावितरणच्या सागवन उपकेंद्राचे वरीष्ठ यंत्रचालक गणेश राणे यांचा समावेश आहे. राणे यांनी नाट्यक्षेत्रात अभिनेता म्हणून भरीव योगदान दिले असून त्यांना राज्यस्तरावर व प्रादेशिक स्तरावर अभिनयासाठी अनेक पारितोषिके प्राप्त झाली आहेत. त्यांना लवकरच मुंबई येथे भव्य शासकीय समारंभात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.

# हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह यांचे त्याग, शौर्य, पराक्रम आणि स्वाभिमानाची गाथा प्रेरणा देणारी- माजी आ. राणा दिलीपकुमार सानंदा

प्रतिनिधी १८ जून

## हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह यांची जयंती मोठया उत्साहात साजरी




**खामगांव:** हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंहजी हे भारतीय इतिहासातील अद्वितीय शौर्य, अटळ स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे सर्वोच्च प्रतीक आहे. महाराणा प्रतापसिंह यांनी प्रतिकुल परिस्थिती असतांनाही कधीही शरणागती पत्कारली नाही. मातृभुमिच्या स्वातंत्र्यासाठी आणि स्वराज्याच्या रक्षणासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या जीवनातील त्याग, शौर्य, पराक्रम आणि स्वाभिमानाची गाथा आजही प्रत्येकाला संकटाशी दोन हात करण्याची प्रेरणा देते असे प्रतिपादन माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी केले.बुधवार दि. १७ जून २०२६ रोजी ज्येष्ठ शुक्ल तृतीयेच्या दिवशी तीथीनुसार विर शिरोमणी, हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह यांची ४८६ वी जयंती टॉवर चौक येथील भारतरत्न स्व.राजीव गांधी उद्यान येथे राजपुत समाजभुषण, शक्तीउपासक राणा गोकुलसिंहजी सानंदा यांच्या अध्यक्षतेखाली व राजपुत समाजातील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन कार्यक्रम पार पडला त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मंचावर करणी सेनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संदिपसिंग राजपुत, राजपुत समाजाचे अध्यक्ष प्रमोदसिंह पाटील, माजी नगराध्यक्ष राणा अशोकसिंह सानंदा, माजी नगराध्यक्षा सौ.अलकादेवी सानंदा, ज्येष्ठ नेते विश्वपालसिंह जाधव, पंजाबरावदादा देशमुख, महेंद्रसिंग राठोड, राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर अध्यक्षा श्रीमती सरस्वतीताई खासने, तालुका अध्यक्ष मनोज वानखडे, श्रीकांतसिंह बयस आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा म्हणाले की, हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह हे भक्ती, शक्ती आणि युक्ती यांचा सुरेख संगम होते.जीवनात यश मिळाले तर अहंकार वाढवु नका आणि अपयश आले तर खचुन जावु नका हा संदेश त्यांच्या जीवनचरित्रातुन मिळतो. समाजभुषण, शक्तीउपासक राणा गोकुलसिंहजी सानंदा यांच्या मार्गदर्शनाखाली मागील अनेक वर्षापासुन खामगाव शहरामध्ये महाराणा प्रतापसिंहजी यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय व राज्य स्तरावरील कुस्ती व कबडड्ी स्पर्धांचे आयोजन करुन युवकांमध्ये क्रिडा भावना व राष्ट्रप्रेम जागृत करण्याचे कार्य निरंतरपणे सुरु आहे. खामगाव शहरात उभारण्यात आलेला महाराणा प्रतापसिंह यांचा अश्वारुढ पुतळा हा केवळ स्मारक नसुन संकटावर मात करण्याची, स्वाभिमानाने जगण्याची आणि राष्ट्रहितासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा देणारा दिपस्तंभ आहे. असे सांगुन राणाजींच्या जयंतीदिनी सर्वांनी राष्ट्रहितासाठी, समाज हितासाठी विधायक कार्य करण्याचा संकल्प घ्यावा असे सांगुन त्यांनी उपस्थितांना हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी करणी सेनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संदिपसिंग राजपुत यांनी हिंद की खातीर शीश मिटा दे हम या कवितेच्या माध्यमातून महाराणा प्रताप व राजपुत समाजाच्या शौर्याबदद्ल माहिती दिली. यावेळी डॉ.आर.के.राजपुत यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणातुन बोलतांना सांगितले की, महाराणा प्रतापसिंह यांच्या सारखी जर जिदद् असेल तर नेहमी विजय प्राप्त होतो.कितीही संकटे आले तरी महाराणाजी डगमगले नाही.ते संकटाला शौर्याने सामोरे गेले.आपले प्राण गेले तरी राजपुत आपले वचन मोडत नाही.खामगाव मतदार संघामध्ये राजपुत समाजाला राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या रुपाने अत्यंत चारित्र्यवान आणि आदर्श नेतृत्व मिळालेले आहे. सर्वांनी एकसंघ होवुन असे नेतृत्व वाढविले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.


सर्वप्रथम राणाजींच्या जयंतीदिनी समाजभुषण, शक्तीउपासक राणा गोकुलसिंहजी सानंदा यांच्या हस्ते अश्वारुढ पुतळयासमोर पादुका पुजन करुन ध्वजारोहन व ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी राणा दिग्वीजयसिंह सानंदा, दुर्गासिंग ठाकुर व रोहितसिंग राजपुत यांच्या हस्ते हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह याच्या अश्वारुढ पुतळयाचे पुजन करुन माल्यार्पण करण्यात आले. जयंतीनिमित्त मा.आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या हस्ते उपस्थितांना लाडु वाटप करुन त्यांचे तोंड गोड करण्यात आले. यावेळी फटाक्यांची भव्य आतिषबाजी करुन हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह की जय, जब तक सुरज चाँद रहेंगा-महाराणाजी का नाम रहेंगा, जय राणा-जय शिवराणा, छत्रपती शिवाजी महाराज की जय, हम सब एक है, भारत माता की जय अश्या गगनभेदी घोषणा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे संचालन पंजाबरावदादा देशमुख यांनी तर आभार प्रदर्शन विश्वपालसिंह जाधव यांनी केले.

या कार्यक्रमाला सहकारमित्र राणा राजेंद्रसिंह सानंदा, उद्योजक राणा मुकेशकुमार सानंदा, राणा आनंदकुमार सानंदा, राणा सागरकुमार सानंदा, राणा अमेयकुमार सानंदा, राणा गौरवकुमार सानंदा, राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला शहर अध्यक्षा सौ.शारदाताई शर्मा, श्रीमती सुलोचना कळींगकर, मलकापुर करणी सेनेचे शहर अध्यक्ष पप्पु ठाकुर, श्रावणसिंह राजपुत, मुन्नाभाऊ जाधव, कृ.उ.बा.स.संचालक विलाससिंग इंगळे, विजय काटोले, राष्ट्रवादीचे खामगाव शहर उपाध्यक्ष नरहरी टीकार, दुर्गासिंग ठाकुर, सुभाषसिंग ठाकुर, किशोरसिंह ठाकुर, तहसिलदारसिंग राजपुत, नारायणसिंह राजपुत, अनुपसिंह ठाकुर, ॠषभसिंह ठाकुर, राजेंद्रसिंह गौतम, प्रतापसिंह ठाकुर, अजयसिंह ठाकुर, संजय शर्मा, राहुल पाटील, दयालसिंग पवार, मोहनसिंग बॅनर्जी, किशोरसिंह राजपुत, अमोल ठाकुर, प्रमोद महाजन, अजय वतपाळ, सुरेश वतपाळ, प्रमोदसिंग जाधव, अक्षयसिंह राजपुत, आनंद राणा, अमोल जाधव, अशोकबाप्पु देशमुख, गणेशआप्पा इंगळे, नंदुसिंग तोमर, कल्याणसिंग तोमर, कल्याणसिंग वतपाळ, शिवाजीराव पांढरे, विठठ्ल धानोरे, विजय रायगावकर, संजय लाहुडकार, अभिजीसिंह ठाकुर, सचिन इंगळे, केशव कापले, अमर पिंपळेकर, प्रताप कदम, संतोष आटोळे, सत्यनारायण शर्मा, प्रफुल कुळकर्णी, मदन गावंडे, सुरेंद्र चव्हाण, श्याम गायगोळ, एजाज देशमुख, पंकज तेरवाडीया, धनंजय वानखडे, सुरेश बोरकर, सतिष तिवारी, मुन्ना बोंद्रे, अजय खोद्रे, निखील देशमुख, दिनेश बोराडे, चंद्रसिंग बोराडे, प्रकाश बोराडे, जग्गु इंगळे, मुकुंदसिंग इंगळे, राहुल पाटील, मोहन पवार, जुलालसिंग पवार यांच्यासह सकल राजपुत समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

# ३ लाख ५० हजारांचे आमिष दाखवून लुटमार करण्याचा डाव उधळला

प्रतिनिधी १८ जून

## मलकापूर शहर पोलिसांकडून दोन आरोपींना रंगेहात अटक, मुद्देमाल जप्त!



**मलकापूर:** हैदराबाद येथून आलेल्या व्यक्तींना साडेतीन लाख रुपयांचे आमिष दाखवून त्यांची लुटमार करण्याचा एका टोळीचा कट मलकापूर शहर पोलिसांनी अत्यंत शिताफीने उधळून लावला आहे. पोलिसांनी मलकापूर येथील गोपाळकृष्णनगर भागात सापळा रचून दोन सराईत इसमांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून वाहनासह मोबाईल फोन व लहान मुलांच्या खेळण्यातील नोटा (बनावट नोटा) असा एकूण ९५,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, हैदराबाद येथून दोन इसमांना ३५,००० रुपयांच्या बदल्यात ३ लाख ५० हजार रुपये देण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. या पैशांच्या बहाण्याने त्यांना मलकापूर येथे बोलावून घेऊन त्यांची लुटमार करण्याचा कट रचण्यात आला आहे, अशी गोपनीय व खात्रीशीर माहिती मलकापूर शहर पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिस पथकाने तातडीने हालचाली करत गोपाळकृष्णनगर परिसरात रणनीतिक सापळा रचला.

या सापळ्यात लुटमारीच्या उद्देशाने आलेल्या दोन संशयित इसमांना पोलिसांनी वेढा घालून रंगेहात ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे १) ईश्वर अशोक मेसरे (वय ३४ वर्षे, रा. नरवेल, ता. मलकापूर, जि. बुलढाणा, ह.मु. यशोधाम कॉलनी, मलकापूर) आणि २) गौतम मुकुंदा तायडे (वय २२ वर्षे, रा. रलाईननगर, मलकापूर, ता. मलकापूर, जि. बुलढाणा) अशी आहेत. **९५,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त:** पोलिसांनी दोन्ही आरोपींची अंगझडती व तपासणी केली असता, त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेला आणि फसवणुकीच्या उद्देशाने आणलेला खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे: भारतीय चलनातील ५००/- रुपयांची १ अस्सल नोट.

अस्सल नोटेच्या खाली ठेवलेल्या, 'चिल्ड्रन्स बँक' असे लिहिलेल्या ५००/- रुपयांच्या एकूण ६९९ हुबेहूब बनावट/खेळण्यातील नोटा.

एक पांढऱ्या रंगाची जुपिटर दुचाकी गाडी.

विविध कंपन्यांचे एकूण चार महागडे मोबाईल फोन (२ ओप्पो, १ रिअलमी, १ ऑनर).

या प्रकरणी पोलिसांनी सर्व मुद्देमाल जप्त केला असून, माननीय पोलिस निरीक्षक (पोनि) यांच्या आदेशान्वये पुढील सखोल तपास पोलिस उपनिरीक्षक (पोउपनि) सतीश बेले यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे. या टोळीने अशाच प्रकारे आणखी काही लोकांना फसवले आहे का, याचा शोध आता पोलिस घेत आहेत.

# खामगाव एसडीओ कार्यालयाच्या प्रवेशद्वाराला आग लावण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी १८ जून

## कर्जमुक्ती आंदोलनाशी संबंधाची चर्चा



**खामगाव :** येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराला मंगळवारी मध्यरात्री अज्ञात व्यक्तींनी आग लावल्याची घटना समोर आली. शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाच्या समर्थनार्थ हे कृत्य करण्यात आल्याची चर्चा असली, तरी त्यास अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. दरम्यान, बुधवारी आंदोलनाने जिल्ह्यात उग्र स्वरूप धारण केले. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी आंदोलन केले, तर एका तरुण शेतकऱ्याने आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने खळबळ उडाली. रविकांत तुपकर हे १५ जूनपासून बुलढाणा येथील त्यांच्या निवासस्थानी अन्नत्याग आंदोलन करत आहेत. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काही कार्यकर्त्यांच्या भावना तीव्र झाल्याची चर्चा सुरू असतानाच खामगावातील आगीची घटना घडली. आग लावणाऱ्या व्यक्तींचा आंदोलनाशी संबंध आहे किंवा नाही, याबाबत प्रशासन अथवा पोलिसांकडून कोणतीही अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही. दुपारी ॲड. शर्वरी तुपकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले. यावेळी चिखली तालुक्यातील अंत्री खेडेकर येथील विठ्ठल खेडेकर या तरुणाने अंगावर ज्वालाग्राही पदार्थ ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी प्रसंगावधान राखत त्याला ताब्यात घेतल्याने अनर्थ टळला. जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळाला प्रवेशद्वारावर रोखण्यात आल्याचा आरोप करत आंदोलकांनी संताप व्यक्त केला, निषेध म्हणून दूध, कांदे, टमाटे व अन्य भाजीपाला रस्त्यावर फेकण्यात आला. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दूध व भाजीपाल्याचा खच पडल्याचे चित्र दिसून आले.

दरम्यान, चिखलीतील उदयनगर परिसरात काही आंदोलक पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करत असल्याची माहिती समोर आली. तसेच पेठ परिसरात समर्थकांनी टायर जाळून निषेध नोंदविला.

# आरटीओ कर्मचाऱ्यांचा संप; कामकाजावर परिणाम!

प्रतिनिधी १८ जून

## विविध प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलन

**खामगाव :** मोटार वाहन विभाग (आरटीओ) कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वात १६ जूनपासून बेमुदत संपाला सुरुवात करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात येत असून, खामगाव उपप्रादेशिक कार्यालयातील कर्मचारीही संपात सहभागी आहेत. यामुळे कार्यालयातील दैनंदिन कामकाजावर मोठा परिणाम झाला असून वाहनधारकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.याकडे लक्ष देण्याची आंदोलकांकडून करण्यात आहे. मागणी आली सेवा प्रवेश नियम तातडीने लागू करणे, नवीन आकृती बंधाची अंमलबजावणी, मागे घेतलेल्या ५६ कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या पूर्ववत करणे, प्रशासकीय पदांवरील प्रलंबित बढत्या देणे, बढतीपूर्व नियमबाह्य परीक्षा रद्द करणे, १०:२०:३० कालबद्ध सेवांतर्गत लाभ लागू करणे तसेच पदांचे नामकरण बदलणे या प्रमुख मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाचा मार्ग स्वीकारला आहे. शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन मागण्यांवर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

**वाहनधारकांची कामे खोळंबली**
बेमुदत संपात खामगाव उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयातील चार वरिष्ठ व तीन कनिष्ठ लिपिक सहभागी झाले आहेत. यामुळे अनेक महत्त्वाच्या सेवा प्रभावित झाल्या आहेत. नवीन वाहनांची नोंदणी, वाहन हस्तांतरण, वाहन चालविण्याच्या परवान्याशी संबंधित प्रक्रिया, फिटनेस प्रमाणपत्रे, वाहन कर भरणा तसेच इतर प्रशासकीय कामांमध्ये विलंब होत आहे. त्यामुळे नागरिक व वाहनधारकांना कार्यालयीन कामांसाठी प्रतीक्षा करावी लागत असून, शासनाने लवकरात लवकर तोडगा काढावा, अशी मागणी होत आहे.

# भरधाव अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक; युवक ठार

प्रतिनिधी १८ जून

**खामगाव :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर अज्ञात वाहनाच्या धडकेत महाळुंगी येथील दुचाकीस्वार युवक जागीच ठार झाल्याची घटना बुधवारी कोलोरी शिवारातील गव्हाण फाट्यानजीक घडली. अपघातानंतर संबंधित वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाल्याने पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, मृत युवकाची ओळख विजय दादाराव वानखडे (३५, रा. महाळुंगी, ता. नांदुरा) अशी झाली आहे. त्यांच्या भाऊ शिवाजी दादाराव वानखडे यांनी खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे. विजय वानखडे हे बुधवारी सकाळी घरातून एसटी बस दुरुस्तीच्या कामासाठी निघाले होते. ते त्यांच्या एमएच-२८-के-१६७४ क्रमांकाच्या दुचाकीवरून राष्ट्रीय महामार्गावर प्रवास करत असताना कोलोरी शिवारातील गव्हाण फाट्याजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेमुळे विजय वानखडे गंभीर जखमी झाले आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातात त्यांच्या दुचाकीचेही मोठे नुकसान झाले. अपघातानंतर वाहनचालकाने जखमीला मदत करण्याऐवजी वाहनासह पलायन केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१, ३२४ (४) तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम १३४(अ), १३४ (ब) आणि १८४ नुसार गुन्हा दाखल केला आहे

# नगरपरिषदेचे लेखी आश्वासन; पाणीपुरवठा ७ ते ८ दिवसांवर आणण्याचा दावा

प्रतिनिधी १८ जून




**मलकापूर:** मलकापूर शहरातील तीव्र पाणीटंचाईच्या प्रश्नावर नागरिकांच्या वतीने काढण्यात आलेल्या जनआक्रोश मोर्चा संदर्भात नगरपरिषद प्रशासनाने आंदोलनाचे नेतृत्व करणारे सामाजिक कार्यकर्ते ओम शिंदे यांना नगरपरिषदेमार्फत लेखी स्वरूपात आश्वासन देण्यात आले आहे.

नगरपरिषद मलकापूरच्या पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आलेल्या पत्रात नागरिकांनी मांडलेल्या मागण्यांवर आवश्यक उपाययोजना करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. नगराध्यक्ष आणि मुख्याधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने देण्यात आलेल्या या पत्रामुळे आंदोलनानंतर प्रशासनाकडून अधिकृत भूमिका समोर आली आहे. पत्रानुसार, सध्याच्या उपलब्ध पाणीसाठा, वितरण व्यवस्था आणि तांत्रिक बाबींचा विचार करून ४५ ते ५० दिवसात शहरातील पाणीपुरवठ्याचे चक्र १० दिवसांवरून ७ ते ८ दिवसांपर्यंत आणण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच नगरपरिषदेच्या निधीतून किंवा उपलब्ध अन्य निधीतून नगरपरिषद हद्दीबाहेरील भागांसाठी कोणतीही नवीन पाईपलाईन अथवा वाढीव कामे करण्यात येणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. उपलब्ध निधीचा वापर शहरातील विद्यमान वितरण व्यवस्था सक्षम करण्यासाठी आणि नागरिकांना अधिक परिणामकारक पाणीपुरवठा करण्यासाठी केला जाणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, पाणीपुरवठ्याची क्षमता वाढविण्यासाठी नवीन पंप खरेदी करण्याची आणि सर्वांगीण सुधारणा करण्याची कार्यवाही प्रस्तावित असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. मात्र तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया, खरेदी आदेश तसेच स्थापनेची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी अंदाजे चार महिन्यांचा कालावधी लागणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. नवीन पंप कार्यान्वित झाल्यानंतर शहरातील पाणीपुरवठ्याचे अंतर आणखी कमी करण्यास मदत होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

दरम्यान, जनआक्रोश मोर्चादरम्यान नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांनंतर नगरपरिषद प्रशासनाने प्रथमच लेखी स्वरूपात भूमिका स्पष्ट केल्याने या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी आणि कितपत होते याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

**आश्वासन नव्हे, कृती हवी**
नगरपरिषदेकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी त्याचे स्वागत केले असले तरी शहरातील नागरिकांना आता प्रत्यक्ष कृतीची अपेक्षा आहे. अनेक वर्षांपासून पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या मलकापूरकरांच्या दृष्टीने हे आश्वासन कितपत प्रभावी ठरते, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरुवार, दि. १८ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# बोरगाव मंजूच्या शेतकरी दूध डेअरीची अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी

प्रतिनिधी १८ जून

**बोरगाव मंजू :** ग्राहकांना सुरक्षित व दर्जेदार अन्नपदार्थ मिळावेत तसेच दुग्धजन्य पदार्थांची गुणवत्ता कायम राहावी, या उद्देशाने अन्न व औषध प्रशासन विभाग, अकोला यांच्या पथकाने बोरगाव मंजू येथील शेतकरी दूध डेअरीची तपासणी केली.




या कारवाईदरम्यान विभागाच्या अधिकाऱ्यांनी दूध, पनीर, तूप तसेच इतर दुग्धजन्य पदार्थांचे नमुने संकलित करून तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले आहेत. संबंधित नमुन्यांचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पदार्थांची गुणवत्ता व अन्न सुरक्षा मानकांनुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

दरम्यान, बोरगाव मंजू परिसरातील सर्व दूध संकलन केंद्रे व दूध विक्री करणाऱ्या ठिकाणांची नियमित पडताळणी करण्याची गरज असल्याची मागणी ग्राहकांकडून होत आहे. दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये कोणत्याही प्रकारची भेसळ होऊ नये, यासाठी प्रशासनाने सातत्याने तपासण्या कराव्यात अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागाकडून भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाच्या खाद्यपदार्थांविरोधात कठोर कारवाई केली जात असून, या तपासणीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये अन्न सुरक्षेबाबत जागरूकता वाढण्यास मदत होणार आहे.

# मकोका कारवाईचा दरारा, शहरात वीस रुपयात मिळतो वा, नजर, आणि कालिबारचा खर्रा

प्रतिनिधी १८ जून

**अकोला :** प्रशासन आणि पोलिसांची कडक कारवाई, तसेच मकोका सारख्या कायद्यांवरील चर्चा, यांचा परिणाम जिल्ह्यातील तंबाखू आणि खर्राच्या विक्रीवर दिसून येत आहे. उघड विक्रीवर बंदी घातल्याने, तंबाखू आणि खर्रा आता गुप्तपणे आणि जास्त किमतीत विकला जात आहे, ज्यामुळे खर्रा प्रेमींना त्रास होत आहे. तथापि, या कारवाईमुळे आणि मकोका सारख्या कठोर कायद्यांवरील चर्चेमुळे जिल्ह्यातील तंबाखू आणि खर्रा विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. असे असूनही, मागणी जास्त आहे, ज्यामुळे काही विक्रेते गुप्तपणे खर्रा आणि तंबाखू विकत आहेत, ज्याचा थेट परिणाम किमतींवर होत आहे. कारवाईनंतर, बाजारात खर्राची उपलब्धता कमी झाली आहे. याचा फायदा घेऊन, काही विक्रेते जास्त दर आकारत आहेत. जो खर्रा २० रुपयांना सहज मिळत असे, तो आता ३० ते ४० रुपयांना विकला जात आहे. तर शहरात सर्वात जास्त मागणी असलेल्या वा, काली बार, तसेच नजर या गुटखा पुड्या २० रुपयांना तीन या भावात विकल्या जात आहेत. ते सुद्धा आपल्या जुन्या ग्राहकांना, नवीन ग्राहकांना तर सपशेल नकार दिला जातो. काही दुकानदार तर गुटखा पुड्या दिल्यानंतर दूर जाऊन खाण्याचे ग्राहकांना सांगत आहेत यावरून विक्रेत्यांनी कारवाईची किती धास्ती घेतली आहे हे दिसून येत आहे.




## हा खेळ किती काळ चालणार?

◆ शहरातील सर्वात मोठा प्रश्न आता हा आहे की, हा छुपा व्यापार किती काळ चालणार. जर प्रशासनाने आपली कारवाई सुरू ठेवली, तर अवैध विक्रीवर प्रभावी निर्बंध शक्य होऊ शकतात. तथापि, सततच्या मागणीमुळे, हा छुपा व्यापार पूर्णपणे संपुष्टात आणणे आव्हानात्मक मानले जात आहे. प्रशासनाच्या धोरणाची आणि देखरेखीची परिणामकारकताच त्याची पुढील दिशा ठरवेल.

## कारवाईची भीती

राज्यात पोलीस आणि प्रशासनाने अलीकडे केलेल्या कारवाईमुळे तंबाखू व्यापाऱ्यांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. सततची तपासणी, धाडी आणि कायदेशीर कारवाईच्या भीतीने अनेक व्यापाऱ्यांनी तात्पुरते आपले व्यवसाय बंद केले आहेत. कडक कायदेशीर तरतुदींमुळे, बहुतेक विक्रेते उघडपणे विक्री करणे टाळत आहेत.

# रूग्णालयातील स्टोअरमधून औषध खरेदीची सक्ती नको, एफडीए 'चा इशारा

प्रतिनिधी १८ जून

**अकोला :** रुग्णांना रुग्णालयाशी संलग्नित औषध विक्रेत्याकडूनच औषध खरेदी करण्याची सक्ती करण्यात येऊ नये. तसे आढळल्यास कारवाई करण्यात येईल, असा इशारा अन्न व औषधे प्रशासनाचे सहायक आयुक्त, औषधे डॉ. अ. मा. माणिकराव यांनी दिला आहे. अन्न व औषध प्रशासन कार्यालयात जिल्ह्यातील मेडिकल असोसिएशन व इंडियन मेडिकल असोसिएशनच्या पदाधिका-यांची बैठक घेऊन सूचना देण्यात आल्या आहेत. भारतीय राज्य घटनेच्या कलम २१ अंतर्गत असलेल्या 'जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांचे संरक्षण' यानुसार, कायद्याने प्रस्थापित केलेल्या कार्यपध्दतीशिवाय कोणत्याही व्यक्तीला तिच्या जीवनापासून किंवा वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित केले जाणार नाही, सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणांमध्ये असे स्पष्ट केले आहे की, आरोग्य आणि वैद्यकीय सेवांचा अधिकार हा कलम २१ अंतर्गत येणारा एक मूलभूत अधिकार आहे. त्यानुसार रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना रुग्णालयाशी संलग्नित, रुग्णालय इमारतीतील किंवा रुग्णालय परिसरातील विशिष्ट औषध विक्रेता आस्थापनेतूनच औषध खरेदी करण्याची सक्ती करण्यात येऊ नये. रुग्णालयाचे किंवा वैद्यकिय व्यावसायीकाने लिहिलेल्या औषधांची प्रिस्क्रिप्शन प्रत रुग्णास किंवा त्याचे नातेवाइकास द्यावी. रुग्णालयाने किंवा वैद्यकीय व्यावसायिकाने रुग्णास प्रिस्क्रिप्शन देण्यास नकार देऊ नये. लिहुन दिलेली औषधे कोणत्याही वैध औषध विक्रेत्याकडून घेण्याची मुभा असल्याची माहिती द्यावी. सर्व संबंधित रुग्णालयांनी फलक ठळक अक्षरात मराठी व इंग्रजी भाषेत दर्शनीय भागात प्रदर्शित करावा. त्यावर 'रुग्णांना या रुग्णालयातील औषध विक्री दुकानातूनच औषध खरेदी करण्याची सक्ती नाही. रुग्ण किंवा त्याचे नातेवाईक कोणत्याही परवानाधारक औषध विक्रेत्याकडून औषधे खरेदी करु शकतात' असे नमूद असावे. या निर्देशाचे पालन न झाल्यास संबंधित संस्थेविरुध्द न्यायालयीन कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

# अकोला जिपच्या सीईओ पदी अनय नितीन नावंदर रुजू



प्रतिनिधी १८ जून

**अकोला :** अकोला जिल्हा परिषदेचे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नितीन नावंदर यांनी आज पदभार स्वीकारला. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे यांनी त्यांच्याकडे पदभार सुपूर्द केला. यूपीएससी २०२१ परीक्षेत अखिल भारतीय ३२ वा क्रमांक प्राप्त करून भारतीय प्रशासकीय सेवेत दाखल झालेले नावंदर हे युवा, अभ्यासू व लोकाभिमुख अधिकारी म्हणून ओळखले जातात. स्वअभ्यासाच्या बळावर त्यांनी हे यश संपादन केले होते. यापूर्वी त्यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी, तळोदा (जि. नंदुरबार) तसेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, तळोदा या पदांवर यशस्वीपणे कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अकोला जिल्ह्यातील ग्रामीण विकासाला नवी दिशा व गती मिळेल, अशी अपेक्षा आहे.

# कुंभारी तलावामध्ये युवकाचा मृतदेह आढळला

**अकोला :** कुंभारी तलावात एका युवकाचा मृतदेह तरंगताना दिसला. १८ वर्षीय युवक कौलखेड भागातील रहिवासी शंतनू मोरे असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले.



हा युवक पोहायला गेला आणि बुडून मरण पावला की अन्य काही कारण आहे याचा तपास पोलीस करीत आहेत. एमआयडीसी पोलिस घटनास्थळी पोहोचले होते. तसेच त्यांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. शंतनू बाभूळगावच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी असल्याचे कळते.







**अकोला :** उपप्रादेशीक कार्यालयात संप सुरु असतांना सामान्य जनतेची मात्र कामे होत आहे. त्यामुळे या संपावर जनतेच्या मनात उलट-सुलट प्रश्न निर्माण झाले आहेत.

# शिवसैनिकावर जीवघेणा हल्ला; लोखंडी रॉडच्या प्रहाराने पाय फ्रॅक्चर

**तोंडाला कपडा बांधलेल्या तिघा अज्ञातांचा हल्ला; उमरखेडमध्ये खळबळ**

प्रतिनिधी १८ जून

**उमरखेड (यवतमाळ) :** शहरातील नाथनगर मार्गावर सोमवारी (१६ जून) सायंकाळी शिवसेना (शिंदे गट) कार्यकर्ते रमेश चव्हाण यांच्यावर तिघा अज्ञात युवकांनी प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. लोखंडी रॉडने झालेल्या बेदम मारहाणीत चव्हाण गंभीर जखमी झाले असून त्यांच्या डाव्या पायाला फ्रॅक्चर झाले आहे. रमेश चव्हाण हे सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास दुचाकीने घरी परतत होते. नाथनगरकडे जाणाऱ्या मार्गावर आमदार किसनराव वानखेडे यांच्या निवासस्थानाजवळ तोंडाला कपडा बांधलेल्या तिघा अज्ञात युवकांनी त्यांची दुचाकी अडवली. त्यानंतर लोखंडी रॉड व चाकूचा धाक दाखवत त्यांच्यावर अचानक हल्ला चढविण्यात आला. हल्लेखोरांनी विशेषतः दोन्ही पायांवर लोखंडी रॉडने जोरदार प्रहार केल्याने चव्हाण गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळले. त्यांना जीवे मारण्याच्या उद्देशानेच हल्ला करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे.



घटनेनंतर जखमी अवस्थेत पडलेल्या चव्हाण यांनी मदतीसाठी आर्त हाक दिली. काही काळ या मार्गावर वर्दळ नसल्याने त्यांना तत्काळ मदत मिळू शकली नाही. दरम्यान, जिजाऊ ब्रिगेडच्या सरोज देशमुख यांनी प्रसंगावधान राखत घटनास्थळी थांबून जखमींची विचारपूस केली व तत्काळ उमरखेड पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत चव्हाण यांना उपचारासाठी प्रथम खासगी रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पुढील उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. डॉक्टरांनी त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर पुढील शस्त्रक्रियेसाठी त्यांना यवतमाळ जिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले. हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून तिघा अज्ञात हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरविण्यात येत आहेत. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून राजकीय वर्तुळातही विविध चर्चांना उधाण आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उमरखेड पोलीस करीत आहेत.

# गंगानगर वासियांचे पावसाळ्यात हाल

प्रतिनिधी १८ जून

**अकोला :** गंगानगर भागामध्ये अमृत योजनेसाठी रस्ते तसेच अन्यत्र खोदकाम करण्यात आले आहे. परंतु संबंधित ठेकेदाराने जमीनीचे समतलीकरण व्यवस्थित केले नसल्यामुळे त्यात पाणी साचते आणि पावसाळ्यात जिकडे तिकडे चिखल झालेला दिसतो. यामुळे वाहनचालवणे अतिशय कठीण होते. गेल्या एक-दोन वर्षापासून या भागातील नागरीकांना ही समस्या त्रासदायक ठरली आहे. तरीही महापालिका यंत्रणेला याकडे लक्ष द्यायला वेळ नाही त्यामुळे या भागातील रहिवाशी संताप व्यक्त करीत आहेत. अजून पावसाळा सुरु झालेला नाही त्यामुळे आतातरी लक्ष द्यावे अशी मागणी आहे.




# जुन्या वादातून २२ वर्षीय युवकावर चाकूने प्राणघातक हल्ला

प्रतिनिधी १८ जून

**अकोला :** शहरातील रामदासपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका २२ वर्षीय तरुणावर चाकू हल्ला झाला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणावर उपचार सुरू असून, जुन्या वादातून तसेच पूर्वी दाखल केलेली तक्रार मागे घेण्यासाठी दबाव टाकण्याच्या कारणावरून हा हल्ला झाल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संतोष भीमा पवार (२२) रा. आंबेडकर नगर, अकोला हा तरुण आपल्या कामानिमित्त परिसरात असताना काही जणांनी त्याला अडवून वाद घातला. यानंतर झालेल्या बाचाबाचीचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपींनी संतोषवर धारदार चाकूने हल्ला केला. हल्ल्यात संतोष गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक तपासात, संतोषने यापूर्वी काही व्यक्तींविरोधात केलेली तक्रार मागे घेण्यासाठी त्याच्यावर दबाव टाकला जात होता. त्यातूनच हा हल्ला घडल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे. घटनेची माहिती मिळताच रामदासपेठ पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसराची पाहणी करून पुरावे संकलित करण्यास सुरुवात केली आहे. तसेच हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत करण्यात आली आहेत. सीसीटीव्ही फुटेजचीही तपासणी करण्यात येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. आरोपींना अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. या प्रकरणाचा तपास रामदासपेठ पोलीस करीत आहेत.







हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK